# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२२

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२ / पौष १, १९४४ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **आदिवासी विकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(३)** | **बंदरे आणि खनिकर्म मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५९**

---

### नवी मुंबईतील विविध भागांमध्ये स्वतंत्र विद्युत पुरवठा सबस्टेशन उभारण्याच्या कामामध्ये दिरंगाई केलेल्या दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करण्याबाबत

**(१) * १५६८४ श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील तळवली गाव, गोठवली, रबाळे, नौसिल नाका व घणसोली नोड येथील विविध भागांमध्ये स्वतंत्र विद्युत पुरवठा सबस्टेशन उभारण्याच्या कामामध्ये दिरंगाई केलेल्या दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २१/०९/२०२२ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनानुसार चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच सबस्टेशन उभारण्याचे काम सुरु करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) निविदेमधील अटी व शर्ती नुसार मे.आयसोटेक जे .व्हि. मे. मनिषा इंजिनिअर्स या एजन्सीला महावितरण कंपनीकडून दिनांक ०६/०५/२०२२ च्या पत्रान्वये Notice for Termination of Contract बजावून सदरचे उर्वरित काम निविदेतील अटी व शर्ती नुसार इतर ठेकेदाराकडून करुन घेण्यात येण्याबाबत सूचित केले आहे. तसेच त्यांच्यावर महावितरणच्या नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणेबाबत.

**(२) * १५९१३ डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.बाळाराम पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.विक्रम काळे, श्री.किशोर दराडे, श्री.किरण सरनाईक, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारी कर्मचारी गेल्या अनेक वर्षापासून जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करणे बाबत संघर्ष करीत असून जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करणेबाबत सुमारे १७ लाख राज्य सरकारी कर्मचारी हे संपाच्या तयारीत आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झारखंड, राजस्थान, छत्तीसगड या राज्यात २००५ नंतर शासन सेवेत रुजू झालेल्या शासकीय-निमशासकीय कर्मचाऱ्यांना अंशदायी निवृत्तीवेतन योजना बंद करुन जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली असून, याच धर्तीवर महाराष्ट्र राज्यात जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करणे बाबत सरकारी कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी शासन दरबारी पाठपुरावा केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त नमूद बाबींच्या अनुषंगाने तत्कालीन वित्त राज्यमंत्री श्री.शंभुराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९ जानेवारी, २०१९ रोजी अभ्यास गटाची स्थापना केलेली असून सदर अभ्यास गटाने त्यांचा अहवाल सादर केला आहे का, अहवालात काय शिफारशी करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करणेबाबत कोणती सकारात्मक कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३)वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १९/०१/२०१९ अन्वये मा.राज्यमंत्री (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण आणि योजनेची परिणामकारकरित्या अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मे. रुपारेल होम्स इंडिया प्रा.लि. या विकासकाने रहिवाशांची फसवणूक केल्याबाबत

**(३) * १५०८७ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)मे. रुपारेल होम्स इंडिया प्रा.लि. या विकासकाने प्लॉट क्र. २६५, TPS III, माहिम डिव्हिजन, टी. एच. कटारिया मार्ग आणि सेनापती बापट मार्ग, माहिम, मुंबई स्थित रतन टेरेस क्र. १ व २, देवी भुवन आणि मनी निवास या उपकरप्राप्त इमारतींच्या पुर्नविकासासाठी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून दिनांक २२/११/२०१३ रोजी उद्देशीय पत्र (LOI) घेतले असताना देखील अद्यापपर्यंत पुनर्विकासाचे काम सुरु केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित विकासकाशी संगनमत करून नियमबाह्यरित्या दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ रोजी IOA दिली असल्याची बाब समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि उक्त उपकरप्राप्त इमारतीतील गोरगरीब रहिवाशांची फसवणूक करणाऱ्या संबंधित विकासक आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने दिनांक २२/११/२०१३ रोजीच्या पत्रान्वये या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेस नकाशे मंजुरीस्तव सादर करण्यासाठी विकासक मे.रुपारेल होम्स इंडिया प्रा.लि. यांना इरादापत्र (LOI) प्रदान केलेले आहे. परंतू, ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी विकासकाने सन २०१४ साली सादर केलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावामध्ये त्रुटी असल्यामुळे अद्यापपर्यंत सदर इमारतींना पुनर्विकासासाठी ना-हरकत प्रमाणपत्र मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत प्रदान करण्यात आलेले नाही.
(२) विकासक मे. रुपारेल होम्स इंडिया प्रा.लि. यांनी सदर उपकरप्राप्त व बिगर उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ च्या विनियम ३३(११) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला सादर केलेल्या प्रस्तावास दिनांक २८/०९/२०२२ रोजी आशयप्रत (LOI) मंजूर करण्यात आले आहे. त्यानुसार पुनर्वसन व विक्री घटकाकरीता संयुक्त इमारत प्रस्तावित असून सदर इमारतीचे दिनांक ३०/०९/२०२२ रोजी आराखडे मंजूर (IOA) करण्यात आले आहे. तथापि, उपकरप्राप्त इमारतीमधील भाडेकरुंची पात्रता निश्चित केल्यानंतरच प्राधिकरणामार्फत पुढील परवानगी देण्यात यईल, असे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिनांक ०४/११/२०२२ रोजी विकासकास व वास्तुविशारद यांना कळविले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वीज कंत्राटी कामगारांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत

**(४) * १५८८३ श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यात विदयुत मंडळाच्या तीन कंपन्यांमध्ये एकूण ५०,००० पेक्षा जास्त लाईटमन तथा तत्सम कामगारांची पदे रिक्त असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूरातील अंदाजे ९०० तथा राज्यातील ४० हजार कंत्राटी कामगार कमी वेतनावर इतर लाभ न घेता सेवा करीत असून त्यांना शासन सेवेत समाविष्ट करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे हे ही खरे आहे काय,
(३) याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कंत्राटी कामगारांना शासन सेवेत समाविष्ट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) महावितरण कंपनीमधील ऑक्टोबर, २०२२ अखेर वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गातील तांत्रिक व अतांत्रिक कामगारांची जवळपास २६,६४८ पदे रिक्त आहेत. तथापि, महानिर्मिती व महापारेषण कंपनीमध्ये लाईटमन तथा तत्सम कामगारांची पदे नाहीत.
(२) महानिर्मिती कंपनीमध्ये कंत्राटदाराच्या अधिनस्त अंदाजे १७,४४३ कंत्राटी कामगार कार्यरत असून महापारेषण व महावितरण मध्ये सर्वसाधारणपणे अनुक्रमे ३,९४० व २१,५५१ कंत्राटी कामगार बाह्यस्त्रोताच्या माध्यमातून काम करतात.

महावितरण, महानिर्मिती व महापारेषण कंपनीमध्ये कामाच्या स्वरूपानुसार प्रासंगिक तसेच तात्पुरती कामे कंत्राटदाराकडून निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून करून घेतली जातात. प्रत्येक वेळेस कंत्राटदार नेमताना बाह्यस्त्रोत कामगारांना किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन अदा केले जाण्याची अट निविदा तसेच संबंधित कंत्राटदाराच्या कार्यादेशामध्ये अंतर्भुत करण्यात येते.
(३) कंत्राटदाराच्या अधिनस्त कार्यरत कंत्राटी कामगार, नियमित मंजूर पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेनुसार भरती प्रक्रियेत पात्रतेनुसार अर्ज करू शकतात. कोणत्याही कर्मचाऱ्यास कंपनीमध्ये थेट सामावून घेतले जात नाही. याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील ॲप्लीकेशन क्र. ११६४६/११७२४/१९९६ मध्ये मागील दाराने (Back door entry) सरकारी नोकरभरती करता येणार नाही व सर्व नोकरभरती स्पर्धा परीक्षेद्वारे करण्याचे आदेश दिनांक २२/०८/१९९६ अन्वये पारित केले आहेत. त्यानुसार कंपनीस्तरावर अंमलबजावणी करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाढवण (जि.पालघर) बंदरास स्थानिक शेतकरी व मच्छिमारांचा विरोध होत असल्याबाबत

**(५) * १५१९६ श्री.कपिल पाटील, श्री.सचिन अहिर, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ११ मधील प्रश्न क्रमांक ७५६० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील वाढवण बंदराविरोधात झाई ते आरोंदाच्या किनारपट्टीवर वसलेल्या १० गावातील रहिवाशांनी तसेच मुंबईतील कोळी बांधवांनी कुलाबा कफ परेडपासून ते पालघरपर्यंत दिनांक २ ऑक्टोबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास जन आंदोलन केले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नियोजित वाढवण बंदर रद्द करावे या मागणीसाठी रहिवाशी, शेतकरी आणि मच्छिमार संघटनांनी जिल्हाधिकारी,पालघर तसेच पालकमंत्री, पालघर यांच्याकडे गेली २ वर्षापासून लेखी निवेदने दिली असून त्यावर अद्यापी कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यातील मागण्यांचे व प्रश्नांचे स्वरूप काय आहे,
(४) असल्यास, वाढवण बंदरामुळे शेतकरी आणि मच्छिमार यांचे होणारे नुकसान व विस्थापन याबाबत शासनाने केलेल्या पाहणीतील निष्कर्ष काय आहेत, असल्यास, विस्थापन व पुनर्वसनाबाबत शासनाची योजना काय आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) नियोजित वाढवण बंदर रद्द करण्याच्या मागणीची निवेदने शासनास प्राप्त झालेली आहेत. नियोजित वाढवण बंदर प्रकल्पामुळे स्थानिक मच्छिमार व शेतकरी यांच्या व्यवसायावर विपरित परिणाम होणार असल्याचे त्यांचे म्हणणे असून त्यामुळे सदर बंदर प्रकल्प रद्द करावा, अशी त्यांची मागणी आहे. तसेच वाढवण बंदर विरोध संघर्ष समितीने केंद्र शासन, पर्यावरण विभाग महाराष्ट्र राज्य व डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरण यांना प्रतिवादी करुन मा.सर्वोच्च न्यायालयात रिट याचिका क्र. २८७/२०२० दाखल केली आहे. याशिवाय काही संस्थांनी वाढवण बंदर विरोधात डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरण यांचेकडे निवेदने सादर केली आहेत. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) व (५) वाढवण बंदर हे मोठे बंदर (Major Port) म्हणून जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरण यांचे मार्फत विकसित करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतलेला असून त्याबाबत दिनांक १९/०२/२०२० अन्वये अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे. बंदर प्रकल्पाची उभारणी करण्यासंदर्भात प्रकल्प आराखडा, विस्तृत प्रकल्प अहवाल आणि इतर अनुषंगिक बाबी जसे की, पर्यावरण अभ्यास, मासेमारीवरील परिणाम इ. संदर्भातील आवश्यक कार्यवाही जेएनपीए यांचेमार्फत करण्यात येत आहे. जेएनपीए यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार प्रस्तावित बंदराकरीता रस्ते व रेल्वे जोडणी उपलब्ध करुन देण्यासाठी करावयाच्या भूसंपादनामुळे कोणत्याही गावाचे स्थलांतर करण्याचे नियोजित नाही. जेएनपीए मार्फत तयार करण्यात आलेल्या विविध अहवालांमधील निष्कर्षांचा अभ्यास करुन तसेच सर्वोच्च न्यायालय, डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरण (डीटीपीए) यांचे निर्णय विचारात घेवून बंदर प्रकल्पाबाबत योग्य तो निर्णय घेण्याची बाब केंद्रशासनाच्या अखत्यारीत आहे. त्यानुसार, जेएनपीए यांचेकडून पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

-----------------

## राज्यातील मच्छिमारांना पाकिस्तान मेरिटाईम सिक्युरिटी एजन्सीने अटक केल्याबाबत

**(६) * १५३८६ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाकिस्तान मेरिटाईम सिक्युरिटी एजन्सीने दोन भारतीय मासेमारी बोटी दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास ताब्यात घेतल्या असून त्यातील १६ मच्छिमारांना अटक केली असून त्यापैकी ७ मच्छिमार पालघर जिल्ह्यातील डहाणूजवळच्या अस्वली गावाजवळील असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे मच्छिमार भारतीय हद्दीत असूनही त्यांना पकडल्याचा दावा बोटमालक मुळजीभाई खोरावा यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्रातील मच्छिमारांची सुटका करण्यासाठी राज्य सरकारने केंद्र शासनाकडे तातडीने पाठपुरावा करावा अशी मागणी मच्छिमार कुटुंबियांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील मच्छिमारांची सुटका करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तातडीने पाठपुरावा करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदरहू दोन्ही बोटी गुजरात राज्यात नोंदणीकृत असल्याने याबाबत निश्चित माहिती उपलब्ध नाही.
(३) व (४) आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून दुसऱ्या देशाच्या हद्दीत गेलेल्या अशा भारतीय नागरिकांना सोडवून आणण्याची बाब देशाच्या परराष्ट्र धोरणातील मुत्सद्देगिरीशी संबंधित आहे. मासेमारी करण्यासाठी इतर देशांच्या सागरी हद्दीत गेलेल्या नागरिकांच्या सुटकेसाठी केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाकडुन कार्यवाही करण्यात येते.

सदरच्या बोटी गुजरात राज्यात नोंदणीकृत असून याप्रकरणी महाराष्ट्रातील ७ नाविकांसह एकूण १६ मच्छिमारांची सुटका होण्याच्या अनुषंगाने मा.मंत्री (मत्स्यव्यवसाय), महाराष्ट्र राज्य यांनी केंद्रशासनाकडे पत्राव्दारे विनंती केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केंद्र शासनाकडे राज्य शासनाची जीएसटीची थकबाकी असल्याबाबत

**(७) * १६००१ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.सुधीर तांबे, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाला केंद्र शासनाने २२ हजार ७९४ कोटी रुपये जीएसटीची थकबाकी दिली नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाकडून माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान महिन्यात १ लाख ४७ हजार ६८६ कोटींचे करसंकलन करण्यात आले असून त्यातील महाराष्ट्र राज्यातून २१ हजार ४०३ कोटीचा जीएसटी केंद्र शासनाकडे जमा करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे जीएसटीच्या थकबाकीची रक्कम मिळण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आलेला नाही हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडून राज्य शासनाची थकबाकी त्वरित मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

जीएसटीच्या अंमलबजावणीमुळे होणारे नुकसान भरुन काढण्यासाठी केंद्र शासनाकडून राज्यांना नुकसान भरपाई दिली जाते. ही नुकसान भरपाई भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचेमार्फत जीएसटी (Compensation to state) ॲक्ट, २०१७ मधील कलम ७ च्या तरतुदीनुसार ऑडिट करुन महसूल प्रमाणित करेपर्यंत, तदर्थ स्वरुपात दिली जाते.

सन २०१७-२०१८ ते २०२०-२०२१ या वर्षाचा महसूल भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांनी प्रमाणित केला असून, ३१ मार्च, २०२१ पर्यंतची सर्व नुकसान भरपाई राज्यास प्राप्त झालेली आहे.

माहे ऑक्टोबर, २०२२ अखेर राज्य शासनाला केंद्र शासनाकडून रुपये २२ हजार, ३७२ कोटी एवढी रक्कम येणे बाकी होते, यापैकी दिनांक ९ नोव्हेंबर, २०२२ रोजी रुपये ५७९२ कोटी व दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ रोजी रुपये २०८० कोटी प्राप्त झाले असून, भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांनी ऑडिट करुन महसूल प्रमाणित केल्यानुसार सन २०१८-१९ व २०१९-२० करीता अतिप्रदानीत झालेली रुपये १२८४ कोटी एवढी रक्कम समायोजित (BOOK ADJUSTMENT) करण्यात आलेली आहे.

सन २०२१-२०२२ व १ एप्रिल, २०२२ ते ३० जून, २०२२ या तिमाहीचे भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचे ऑडिट अजून बाकी असून, उर्वरित रुपये १३२१५ कोटी एवढी रक्कम या दोन वर्षांच्या भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांच्या ऑडिट पूर्ण झाल्यानंतर जीएसटी (Compensation to state) ॲक्ट, २०१७ मधील कलम ७ च्या तरतुदीनुसार राज्यास प्राप्त होईल.

(२) होय, हे खरे आहे.

(३) नुकसान भरपाई राज्यास मिळण्यासाठी केंद्रास वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अप्पर पैनगंगा प्रकल्प ईसापुर धरणाचे “आद्य क्रांतिवीर राजे नोवसाजी नाईक जलाशय” असे नामकरण करण्याबाबत

**(८) * १५१४१ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अप्पर पैनगंगा प्रकल्प ईसापुर धरणाचे “आद्यक्रांतिवीर राजे नोवसाजी नाईक जलाशय” असे नामकरण करण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी वारंवार शासनाकडे केलेली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आद्यक्रांतिवीर राजे नोवसाजी नाईक यांनी कळमनुरी तालुक्यातील किल्ले वडगाव व उमरखेड पर्यंत संपूर्ण पैनगंगा नदीच्या खोऱ्यात वास्तव्य करून सतत स्वातंत्र्याचा लढा लढला, ईसापुर धरण (ता.पुसद जि.यवतमाळ) या ठिकाणी त्यांचे ३१ जानेवारी, १८१९ नंतर काही वर्षे वास्तव्य होते हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांच्या स्मरणार्थ त्यांनी देशासाठी, शेतकऱ्यांसाठी, कष्टकरी रयतेसाठी केलेला त्याग विचारात घेऊन व त्यांच्या इतिहासाची पुढच्या पिढीला प्रेरणा मिळण्यासाठी ईसापुर धरणाचे “आद्यक्रांतिवीर राजे नोवसाजी नाईक जलाशय” असे नामकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

उर्ध्व पैनगंगा प्रकल्प ईसापूर धरणाचे “आद्यक्रांतिवीर राजे नोवसाजी नाईक जलाशय” असे नामकरण करण्यात यावे यासाठी श्री.गोपीचंद पडळकर, वि.प.स. यांनी दिनांक ०४/०३/२०२२ रोजी औचित्याचा मुद्दा तसेच, महाराष्ट्र विधानपरिषद नियम-९२(२) अन्वये, सुचना क्र.२७२३ नुसार अर्धा-तास चर्चा उपस्थित केली होती.

(२) ईसापुर धरण (ता.पुसद, जि.यवतमाळ) या ठिकाणी राजे नोवसाजी नाईक यांनी ३१ जानेवारी, १८१९ नंतर वास्तव्य केले किंवा कसे याबाबत सद्य:स्थितीत क्षेत्रिय कार्यालयाकडे ठोस अभिलेखे उपलब्ध नाहीत.
(३) जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील धरणे/ जलाशयांच्या नामांतरणाबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास विभागामार्फत काळा घोडा, मुंबई येथील इमारतीमधील जागा भाडेतत्वावर घेतल्याबाबत

**(९) * १५५८९ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभागामार्फत काळा घोडा, मुंबई येथील Quest नावाची इमारत अंदाजे १७,५०,००० रुपये प्रति महिना दराने भाड्याने घेतली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू इमारत भाड्याने किती दिवसांकरीता व कोणासाठी घेतली होती तसेच भाड्यापोटी एकूण किती रक्कम अदा केली आहे,
(३) असल्यास, सदर भाड्यापोटी देण्यात येणारा खर्च कोणत्या लेखाशीर्षाखाली करण्यात आला होता,
(४) असल्यास, मेळघाट मध्ये आजही मोठ्या प्रमाणात कुपोषणाच्या घटना घडत असतानाही आदिवासींच्या विकासासाठी येणाऱ्या निधीचा अपव्यय करणाऱ्या या प्रकरणाची चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

आदिवासी समाजाकरीता विविध प्रकारचे नाविन्यपूर्ण उपक्रम अनेक संस्था, राज्य शासन य केंद्र शासनाद्वारे राबविल्या जातात. सदर योजनांचा लाभ आदिवासी समाजापर्यंत पोहचावा याकरीता शासनाच्या इतर विभागाशी समन्वय साधून, विविध माहितीचे संकलन करुन आदिवासी समाजासाठी होणाऱ्या कामांचे विशेष संनियंत्रण करणे आवश्यक असल्याने आदिवासी लोकसंख्या, आदिवासी आश्रमशाळा व वसतिगृहांतील मूलभूत सुविधा, विद्यार्थ्यांची सांख्यिकी माहिती, धोरणात्मक बाबींसाठी क्षेत्रिय स्तरीय माहितीचे संकलन व संस्करण अशी महत्वाची कामे पार पाडण्यासाठी आवश्यक विशेष कौशल्य असणारे मनुष्यबळ व विशिष्ट यंत्रणा म्हणुन आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेतंर्गत नाविन्यपूर्ण नियोजन व संनियंत्रण कक्ष (क्वेस्ट) स्थापन करणेत आला आहे. याकरीता काळा घोडा, मुंबई येथील वन फोर्ब्स इमारतीमधील ५६३६ चौ. फुट जागा भाड्याने घेणेत आली होती. सदर जागा रुपये १२६/- प्रती चौ. फुट प्रती महिना या दराने भाडे तत्वावर घेणेत आली होती. (त्यात दर वर्षी ६ टक्के वाढ नमूद करण्यात आली आहे.) सदर भाडे वाजवी असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी प्रमाणित केले आहे.

सदर जागेचा भाडे करार दिनांक ३ नोव्हेंबर, २०१७ पासून पुढील पाच वर्षाकरीता करणेत आला होता. तथापि, सदर जागेचा ताबा दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१ रोजी सोडणेत आलेला असून सदर कालावधीकरीता जागा भाडे व इतर सुविधांकरीता अदा करणेत आलेली रक्कम रुपये ५,६९,५२,०६०/- इतकी आहे.

सदर खर्च भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१)(लेखाशीर्ष २२२५ ई ०३३) अंतर्गत व विशेष केंद्रीय सहाय्य (लेखाशीर्ष २२२५ ई ०४२) या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून शासनास सदर कक्षाकरीता प्राप्त निधीतुन करणेत आला आहे.
(४) प्रश्न भाग १ ते ३ मधील उत्तरात नमूद वस्तुस्थिती विचारात घेता निधीचा अपव्यय झालेला नसल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जायकवाडी धरणाचे बॅकवाटरचे पाणी नदीकाठी सर्वत्र पसरत असल्याने गंगापूर तालुक्यातील भिवधानोरा ते कोंडापूर येथे जाण्यासाठी तराफ्याचा वापर करण्यात येत असल्याबाबत

**(१०) * १५३४१ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गंगापूर तालुक्यातील गोदावरी नदीकाठीच्या भिवधानोरा शिवारातील काही भाग शिवना नदीच्या दोन्ही बाजूस आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जायकवाडी धरणाचे बॅकवाटरचे पाणी नदीकाठी सर्वत्र पसरत असल्याने शेतकरी, ग्रामस्थांना, विद्यार्थ्यांना भिवधानोरा येथे येण्या-जाण्यासाठी तराफयावरुन प्रवास करावा लागतो हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून भिवधानोरा ते कोंडापूर रस्त्याचे काम करण्यात येणार आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून भिवधानोरा ते कोंडापूर रस्त्याचे काम तात्काळ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशतः खरे आहे.
(३) या विभागाशी संबंधित नाही. तथापि, सदर रस्ता मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या निकषात बसत नसल्यामुळे हाती घेता येणार नाही असे महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त उत्तरात नमूद करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्रधानमंत्री आवास घरकूल योजनेतील वंचीत लाभार्थ्यांची अनुदानाची रक्कम प्रलंबित असल्याबाबत

**(११) * १५४५२ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील कोंदामेंढी येथे प्रधानमंत्री आवास घरकूल योजनेतील गरीब लाभार्थींनी उसनवारी करुन कर्ज घेऊन घरांचे बांधकाम केले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन वर्षापासून लाभार्थ्यांना बांधकामाचा शेवटचा रुपये ९० हजाराचा हप्ता न मिळाल्यामुळे लाभार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला असून केंद्र शासनाकडून उक्त योजनेचा निधी दीड वर्षापासून मिळाला नाही हे ही खरे आहे काय,
(३) तसेच गोंदिया जिल्ह्यात घरकूल मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना अनुदानाचे हप्ते मिळाले नव्हते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी मा.उप मुख्यमंत्री यांनी दिवाळीपूर्वी अडलेले अनुदान घरकूल लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याचे निर्देश गृहनिर्माण विभागाला दिले आहेत, त्यानुसार किती लाभार्थ्यांना अनुदान देण्यात आले आहेत,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या वंचित लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून अनुदानाची रक्कम मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या एकूण २३ प्रकल्पांना केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीची मंजूरी प्राप्त असून, सदर प्रकल्पांना दिनांक २५/०२/२०२२ पर्यंत राज्य शासनाच्या हिश्श्यापोटीच्या रूपये २०४.६८ कोटी इतक्या निधीपैकी रूपये २०१.५४ कोटी इतका निधी व केंद्र शासनाच्या हिश्श्यापोटीच्या रूपये ३०७.०२ कोटी इतक्या निधीपैकी रूपये १२२.६० कोटी इतका निधी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना वितरीत करण्यात आला असल्याचे म्हाडा प्राधिकरणाने कळविले आहे.
(३), (४) व (५) गोंदिया जिल्ह्यात एकूण १४ प्रकल्पांना केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने मंजूरी दिली असून, त्यापैकी MIS Portal वर अद्ययावत असलेल्या १३ प्रकल्पांना राज्य शासनाच्या हिश्श्यापोटीच्या रूपये ४१.९२ कोटी इतक्या निधीपैकी रूपये ३१.२० कोटी व केंद्र शासनाच्या हिश्श्यापोटीच्या रूपये ६२.९७ कोटी इतक्या निधीपैकी रूपये २०.२४ कोटी इतका निधी गोंदिया जिल्ह्यातील नगरपरिषद / नगरपालिका यांना वितरीत करण्यात आला असल्याचे म्हाडा प्राधिकरणाने कळविले आहे.
केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीचे १००% उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास सादर करण्यात आले असून उर्वरीत केंद्र हिश्श्याच्या निधीसाठी शासन स्तरावरून पाठपुरावा करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मजितपूर (जि.गोंदिया) येथील शासकीय आदिवासी शाळेतील मुला-मुलींना क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी अमानवी पध्दतीने ट्रकमध्ये बसवून नेण्यात आल्याबाबत

**(१२) * १५२५७ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मजितपूर (जि.गोंदिया) येथील शासकीय आदिवासी शाळेमध्ये १२० विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नेताना अमानवी पध्दतीने एकाच ट्रकमध्ये बसवून प्रवास करित असताना सुमारे दहा

विद्यार्थी-विद्यार्थीनींना श्वास घेण्यास जागा न मिळाल्याने बेशुध्द पडल्याची घटना दिनांक २५ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेशुध्द झालेल्या मुलांना एकोडी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे हे ही खरे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या आणि जबाबदारीचे योग्यरितीने पालन न करणाऱ्या शाळा प्रशासनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) होय.
(२) होय.
(३) होय, चौकशीमध्ये दोषी आढळून आल्याने श्री.एस.के.थुलकर, माध्यमिक मुख्याध्यापक, शासकीय आश्रमशाळा, मजितपूर तसेच श्री.एन.टी.लिल्हारे, क्रीडा समन्वयक, शासकीय आश्रमशाळा, मजितपूर यांना अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांनी दिनांक २५/०९/२०२२ च्या आदेशान्वये निलंबित केलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर येथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करणेबाबत

**(१३) * १५७०७ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी : तारांकित प्रश्न क्रमांक २९८ ला दिनांक १८ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन व्हावे, यासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापूर या सहा जिल्ह्यातील बार असोसिएशन, पक्षकार आणि नागरिक गेल्या ३५ वर्षांपासून लढा देत असून खंडपीठ कृती समितीने गेल्या वर्षभरात राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा व पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर येथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ सुरू करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोल्हापूर येथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येतआहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) व (३) राज्यात उच्च न्यायालयाचे नवीन खंडपीठ स्थापन करण्यास बराचसा कालावधी लागू शकतो, ही बाब विचारात घेवून प्रलंबित खटल्यांची संख्या, मुंबई शहरापासूनचे अंतर व लोकसंख्या या निकषांवर कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ (सर्किट बेंच) स्थापन करण्यास मान्यता देण्यात

यावी. तसेच पुणे येथेही मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ (सर्किट बेंच) स्थापन करण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात यावा, अशी शिफारस करण्याबाबतचा निर्णय दिनांक १२/०५/२०१५ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. तशी शिफारस मा.मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना दिनांक १७/०७/२०१५ रोजीच्या शासन पत्रान्वये करण्यात आली आहे. सदर शिफारशीचा सकारात्मक विचार करण्याची फेरविनंती दिनांक २८/०२/२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये मा.मुख्य न्यायमुर्ती यांना करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी त्वरित निर्णय होण्याकरीता बैठक आयोजित करण्याबाबत शासन पत्र, दिनांक १९/०१/२०१९ अन्वये मा.मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना विनंती करण्यात आली आहे तर शासन पत्र, विधि व न्याय विभाग, दिनांक १९/०३/२०२० अन्वये सदर विनंतीकडे उच्च न्यायालय प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे.

शासन पत्र, दिनांक ०८/०३/२०२२ अन्वये नियमित खंडपीठ स्थापन होईपर्यंत शक्य तितक्या लवकर कोल्हापूर येथे सर्किट बेंच स्थापन करण्याची विनंती मा.मुख्य न्यायमुर्ती यांना करण्यात आली होती. मा.मुख्य न्यायमुर्ती यांची दिनांक १०/०३/२०२२ रोजी कोल्हापूर खंडपीठ समिती तसेच इतर विभागातील बार असोसिएशनच्या सदस्यांसोबत बैठक पार पडली. सदर बैठकीत फिरते खंडपीठ स्थापन करण्याची प्रक्रिया, विधिविषयक बाबी तसेच आवश्यक पायाभूत सुविधा विचारात घेऊन, फिरते खंडपीठ स्थापनेबाबत निर्णय होण्याकरीता काही वेळ आवश्यक असल्याचे उपस्थितांच्या निदर्शनास आणण्यात आल्याचे, मा.मुख्य न्यायमुर्तीं यांनी दिनांक १५/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनास कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरात ई-सिगारेटवर बंदी घालून बेकायदेशीरपणे विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१४) * १५४६८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात गेल्या काही काळापासून विना धूर “ई” सिगारेट बाजारात आल्या असून त्या शाळा व महाविद्यालयांजवळील पानटपऱ्या, दवाखाने, पालिका कार्यालय, प्रशासकीय कार्यालयाच्या आवारातील टपऱ्यांवर त्यांची विक्री होत असल्याचे माहे सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही सिगारेट काही ठिकाणी कमी किंमतीत व सहज मिळत असल्यामुळे सध्या अनेक शालेय विद्यार्थीही या ई-सिगारेटच्या अधीन झाले असून त्यांचे पालक व शिक्षक यांच्यामध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे तसेच काही ठिकाणी या सिगारेटची किंमत ७५०/- रुपयांपासून ५०००/- रुपयांपर्यंत असल्याने पालकांचे मोठ्याप्रमाणात आर्थिक नुकसानही होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नव्या ई-सिगारेट वेगवेगळे आकारात मिळत असल्याने याबाबत कारवाई करण्याचे अधिकार प्रशासनाला नसल्याने कोणतीच कारवाई करण्यात येत नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ई-सिगारेटवर बंदी घालण्याची मागणी पालक, शिक्षक आणि अनेक सामाजिक संघटनांकडून शासनाकडे करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उपरोक्त प्रकरणाची माहिती घेवून ई-सिगारेट वर तातडीने बंदी घालून त्यांची बेकायदा विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, ई-सिगारेट प्रतिबंध (उत्पादन, निर्मिती, आयात, निर्यात, वाहतूक, विक्री, वितरण, साठवणूक आणि जाहिरात) कायदा, २०१९ मधील तरतुदीनुसार बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत सन २०२२ मध्ये २० गुन्हे दाखल करण्यात आले असून ३४ आरोपींना अटक करून रुपये ३३,६५,४३०/- इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

ई-सिगारेट प्रतिबंध (उत्पादन, निर्मिती, आयात, निर्यात, वाहतूक, विक्री, वितरण, साठवणूक आणि जाहिरात) कायदा, २०१९ मधील कलम ३(ब) व ६(१) नुसार कारवाई करण्याचे अधिकार प्रशासनाला आहेत.

(४) व (५) ई-सिगारेट प्रतिबंध (उत्पादन, निर्मिती, आयात, निर्यात, वाहतूक, विक्री, वितरण, साठवणूक आणि जाहिरात) कायदा, २०१९ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येते. त्यानुसार बृहन्मुंबई आयुक्तालयांतर्गत सन २०२१ मध्ये १ तर सन २०२२ मध्ये २० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गिरणी कामगारांना म्हाडातर्फे सवलतीच्या दरात गिरण्यांच्या जागेवर घरे उपलब्ध करून देण्याबाबत

**(१५) * १५९११ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.सचिन अहिर, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनातर्फे मुंबईतील गिरणी कामगारांच्या पुनर्वसनासाठी त्यांना म्हाडातर्फे सवलतीच्या दरात गिरण्यांच्या जमिनीवरील घरे मालकी हक्काने देण्याचा निर्णय घेण्यात आला होता हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आतापर्यंत किती गिरणी कामगारांना घरे उपलब्ध करुन देण्यात आली तसेच त्यासाठी गिरणी कामगारांकडून म्हाडाकडे १ लाख ७५ हजार अर्ज आले असून गिरण्यांच्या जागेच्या उपलब्धतेनुसार कामगारांना केवळ २५ हजार घरे देता येणार असून उर्वरित १ लाख ५० हजार गिरणी कामगारांना घरे उपलब्ध होणार नाहीत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बृहन्मुंबईमध्ये गिरण्यांच्या जागेवर म्हाडास उपलब्ध होणारी जागा व गिरणी कामगारांच्या अर्जांची संख्या विचारात घेता, ठाणे जिल्ह्यातील ५ गावातील ११० एकर शासकीय जमिनी म्हाडास विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत काय,

(४) तसेच, मौजे कोन (ता.पनवेल, जि.रायगड) येथील कोविड-१९ रुग्णांच्या विलगीकरणासाठी देण्यात आलेल्या सदनिकांची दुरुस्ती करणे आवश्यक असून रेंटल हौसिंग योजनेंतर्गत एमएमआरडीए कडील २४१७ सदनिकांच्या बाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात आली आहे,
(५) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उर्वरित दीड लाख गिरणी कामगारांना घरे उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) बृहन्मुंबईमधील ५८ गिरण्यांच्या जमिनीवर म्हाडाचा वाटा निश्चित झालेल्या ३७ गिरण्यांच्या १६.०४ हेक्टर जमिनींवर गिरणी कामगारांसाठी सद्य स्थितीत १३,४७६ सदनिकांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.
(३), (४), (५) व (६) बृहन्मुंबईमध्ये गिरण्यांच्या जागेवर म्हाडास उपलब्ध होणारी जागा व गिरणी कामगारांच्या अर्जांची संख्या विचारात घेता, ठाणे जिल्ह्यातील ५ गावातील ११० एकर शासकीय जमिनी गिरणी कामगारांच्या घरांकरीता म्हाडास उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

मौजे कोन ता.पनवेल जि.रायगड येथील रेंटल हौसिंग योजनेंतर्गत गिरणी कामगारांच्या घरासाठी उपलब्ध झालेल्या २,४७१ सदनिका कोविड-१९ रुग्णांच्या विलगीकरणासाठी देण्यात आल्या होत्या. सदर सदनिकांची दुरवस्था झाली असल्यामुळे उक्त सदनिकांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदनिकांचा ताबा गिरणी कामगारांना देण्यापूर्वी या सदनिकांची दुरुस्ती व इतर कामे करावयाची असल्याने त्याकरीता अंदाजे रुपये ५२.७१ कोटी खर्च अपेक्षित असून, तो खर्च म्हाडाकडून एम.एम.आर.डी.ए. ला प्राप्त होणाऱ्या सदनिकांच्या किंमतीतून वजा करुन, उर्वरित रक्कम म्हाडाने एम.एम.आर.डी.ए. ला प्रदान करण्याबाबत दिनांक ०७/०४/२०२२ रोजी तत्कालीन मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचेकडे पार पडलेल्या बैठकीत ठरले. त्यानुसार सदनिकांच्या दुरुस्तीच्या कामाकरीता अपेक्षित असलेला खर्च एम.एम.आर.डी.ए. ने करण्यासंदर्भात उचित आदेश देण्याची विनंती नगरविकास विभागास करण्यात आली आहे .

-----------------

## राज्यातील पदोन्नत पोलीस उपनिरीक्षकांना नियुक्ती व प्रशिक्षणाचे आदेश देवून वेतनश्रेणीचा लाभ देण्याबाबत

**(१६) * १५६३९ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ४ हजार सहायक पोलीस उपनिरिक्षकांची पोलीस उपनिरीक्षक पदावर नियुक्ती करण्यात येऊनही आस्थापना विभागाकडून प्रशिक्षणाबाबत अद्याप आदेश प्राप्त झाले नसल्याचे व तीन महिने होऊनही अद्याप पदोन्नत उपनिरीक्षकांना मूळ वेतनावर काम करावे लागत असल्याचे दिनांक १७ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पदोन्नत पोलीस उपनिरीक्षकांना त्वरित प्रशिक्षणाचे आदेश देवून त्यांना वेतनश्रेणीचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) गृह विभाग, दिनांक २५/०२/२०२२ च्या शासन निर्णयान्वये पोलीस दलामध्ये किमान ३० वर्षे सेवा पूर्ण असलेले आणि सहायक पोलीस उप निरीक्षक या पदावर किमान ०३ वर्षे सेवा पूर्ण असलेले आणि आश्वासित प्रगती योजनेनुसार पोलीस उप निरीक्षक संवर्ग पदाची वेतनश्रेणी घेत असलेले असे तीनही निकष पूर्ण करणारे सहायक पोलीस उप निरीक्षक संवर्गातील अंमलदारांना "श्रेणी पोलीस उप निरीक्षक" (Grade PSI) असे संबोधण्यात यावे, अशा आशयाचा निर्णय घेण्यात आला असून, सदरहू श्रेणी पोलीस उप निरीक्षक यांना सेवाज्येष्ठतेनुसार पोलीस उप निरीक्षक पदावर नियमित पदोन्नती मिळेपर्यंत सहायक पोलीस उप निरीक्षकाचीच काम पाहतील असा निर्णय आहे.

प्रस्तुत शासन निर्णयातील निकषानुसार अंमलबजावणीबाबत नेमण्यात आलेल्या सुकाणू समितीने अंमलबजावणीमधील अडचणींबाबत अहवाल शासनास सादर केला असून, सदरहू अहवालानुसार काही तांत्रिक बाबींचे निराकरण करण्याचे दृष्टीने प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे. प्रस्तावास वित्त विभागाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर या संदर्भात अंमलबजावणी विषयक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

-----------------

## डहाणू, तलासरी, जव्हार आणि विक्रमगड (जि.पालघर) या दुर्गम आदिवासी बहुल तालुक्यांमध्ये धर्मांतरणांचे प्रकार घडत असल्याबाबत

**(१७) * १५७६३ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू, तलासरी, जव्हार आणि विक्रमगड (जि.पालघर) या दुर्गम आदिवासी बहुल तालुक्यात धर्मांतरणाचे प्रकार अनेक वर्षांपासून सुरू आहेत तसेच कमल सिंघ व त्याचा सोबत असलेले काही सहकारी यांनी नगर जिल्ह्यातील गावागावात जाऊन लोकांना पैशाचे खोटे आमिष दाखवून अनधिकृतरित्या धर्मांतरण केल्याची बाब दिनांक १४/०४/२०२२ व त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,अहमदनगर जिल्ह्यातील अनधिकृत धर्मांतरासंदर्भात विविध संघटनांच्या पाठपुराव्यामुळे दिनांक १५/०४/२०२२ रोजी व त्यासुमारास श्रीमती मीराबाई सुभाष हरेल यांनी राहुरी पोलीस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला असून त्यावर अद्याप पोलीस विभागाकडून कोणतीही कारवाई केलेली नसल्याचे आढळून आले असून संबंधित आरोपी कमल सिंघ यांनी अहमदनगर जिल्ह्यात धर्मांतरासाठी ७५० कोटी रुपये आणले असून कमल सिंघ यांच्याविरुध्द जो आवाज उठवेल त्यांचाविरुध्द त्यांचा माणसाकडून आणि स्थानिक पोलिसांकडून 'atrocity' गुन्हा दाखल करण्याची धमकी देण्यात येत असल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक ठिकाणी हिंदू, आदिवासी आणि धर्मातरण केलेले ख्रिश्चन आदिवासी यांच्यात सण-उत्सव आणि इतर प्रथा साजऱ्या करण्यावरुन वारंवार वाद निर्माण होण्याचे प्रकार घडत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात आरोपीला मदत करण्यासाठी तत्कालीन गृहमंत्री यांनी आरोपी विरुध्द कारवाई करु नये असे निर्देश पोलीस प्रशासनाला दिले असून याबाबत राहुरी पोलीस स्टेशनचे प्रभारी प्रताप दराडे आणि तपास अधिकारी यांनी आरोपी कमल सिंघ यांच्या कडून मोठ्या प्रमाणात पैसे घेतले असूनही आत्तापर्यंत शासनाने पोलिसांविरुध्द व दोषींविरुध्द कोणतीच कारवाई केलेली नसल्याची माहिती समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, डहाणू येथील सरावली तलावपाडा येथे चार ख्रिश्चन मिशनरींनी आदिवासी महिलेला धमकावून व आमिष दाखवून धर्माचे पालन करू नका, अशी सक्ती केली जात असल्याची बाब तक्रारीद्वारे दिनांक ०५/०८/२०२२ रोजी व त्यासुमारास निदर्शनास आली याबाबत श्रीमती येसू वसंत धोडी, धर्म-हिंदू या आदिवासी समाजाच्या महिलेने पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त सर्व प्रकरणांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उपरोक्त प्रकरणांस जबाबदार असणाऱ्या दोषींवर तसेच संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणात अहमदनगर जिल्ह्यात कमल सिंघ व इतर यांच्याविरुध्द राहुरी पोलीस ठाणे, जि.अहमदनगर येथे दिनांक १३/०४/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) श्रीमती मीराबाई सुभाष हारेळ यांच्या तक्रारीनुसार राहुरी पो.स्टे. येथे भा.दं.वि. कलम ३५४, २९५, २९५-अ अन्वये गु.र.क्र. २९६/२०२२ दाखल करण्यात आला आहे. मात्र अहमदनगर जिल्ह्यात धर्मांतरासाठी रुपये ७५० कोटी आणल्याचे अथवा कमल सिंघविरुध्द आवाज उठवणाऱ्यांविरुध्द पोलिसांकडून ॲट्रॉसिटी गुन्हा दाखल करण्याची धमकी दिल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) अशा प्रकारच्या घटना पालघर आणि अहमदनगर जिल्ह्यात निदर्शनास आलेल्या नाहीत.
(४) नाही.
(५) होय, श्रीमती येसू वसंत धोडी या महिलेच्या फिर्यादीवरुन दिनांक ०५/०८/२०२२ रोजी डहाणू पोलीस ठाणे येथे चार मिशनऱ्यांविरुध्द भा.दं.वि. कलम १५३-अ, २९५-अ, ४४८, ३४ प्रमाणे गु.र.क्र. ११९/२०२२ दाखल करण्यात आला आहे.
(६) होय, शासनाने चौकशी केली असून पालघर जिल्ह्यातील डहाणू पो.स्टे. येथे गु.र.क्र. ११९/ २०२२ तसेच श्रीमती मीराबाई सुभाष हारेळ यांच्या तक्रारीनुसार राहुरी पो.स्टे., जि.अहदमनगर येथे गु.र.क्र. २९६/२०२२ दाखल आहे. उपरोक्त नमूद गुन्ह्यांचा पुढील तपास सुरु असून विलंब झालेला नाही.

-----------------

## ताडदेव (मुंबई) येथील पोलीसांसाठी राखीव असलेल्या भूखंडाच्या विक्रीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१८) * १६१९० श्री.अंबादास दानवे, ॲड.अनिल परब, श्री.राजहंस सिंह, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ताडदेंव (मुंबई) मधील पोलिसांकरीता राखीव असलेल्या भूखंडाचे खोटे व बनावट दस्तऐवज करुन काही भाग एस.डी.कार्पोरेशन व एस.डी.कार्पोरेशन प्रा.लि.कंपनी या कंपन्यांसह मालक अमित ठक्कर, दिलीप ठक्कर, संचालक विश्वास मोरे, श्री.निवास अय्यर, झुबेन मर्चंट व निरव दलाल यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तत्कालीन अधिकाऱ्यांच्या संगनमताने नियमांचे उल्लंघन करुन सदरहू जमिनीवर उंच इमारत बांधुन फ्लॅट विक्री करुन रुपये ३०० कोटींचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधितांविरुध्द ताडदेव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने नियमांचे उल्लंघन करुन पोलिसांकरीता राखीव असलेल्या जमिनीवर इमारत बांधणाऱ्या विकासकावर व विकासकास मदत करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय.

मा.अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी, ४ थे न्यायालय, गिरगाव, मुंबई यांनी दिनांक २६/०९/२०२२ रोजीचे आदेशान्वये दिनांक २९/०९/२०२२ रोजी ताडदेव पो. ठाणे गु.र.क्र. ६७९/२२, भादवि कलम-४०९, ४२०, ४४७, ४६४, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब)(एमईसीआर क. ५/२२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई मुंबई यांचे आदेशान्वये आर्थिक गुन्हे विभाग येथे पुढील तपास कामी वर्ग करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याची आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे गु.र.क्र. १४६/२२ कलम ४०९, ४२०, ४४७, ४६४, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब) अन्वये दिनांक २२/१०/२०२२ रोजी नोंद घेण्यात आली असून गुन्हयाचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई येथे आश्रमशाळा चालविणाऱ्या संस्थाचालकावर मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी कारवाई करण्याबाबत

**(१९) * १५१३३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सचिन अहिर, श्री.राजहंस सिंह, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील सी वूड परिसरातील चर्चमध्ये बेथेल गोस्पेल ट्रस्टच्या माध्यमातून बेकायदेशीररीत्या आश्रमशाळा चालविल्या प्रकरणी शासनाने माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान कारवाई केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कारवाई दरम्यान सुटका करण्यात आलेल्या ४५ मुलींपैकी चार मुलींनी संस्थाचालकाच्या विरोधात लैगिंक शोषणाची तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आश्रमशाळेत राहणाऱ्या मुलांमुलींनी यापूर्वी संस्थाचालकांविरुध्द तक्रार करुन सुध्दा त्यांच्यावर कोणतीही कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लैंगिक शोषण करणाऱ्या संस्थाचालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सदर प्रकरणी एनआरआय सागरी पोलीस ठाणे येथे गुरजिनं २०६/२०२२, भादंवि कलम ३५४, ३५४(अ), ३२३ सह पोक्सो कायदा २०१२ चे कलम ८, तसेच जे जे ॲक्ट २०१५ चे कलम ७५, ८२ अन्वये दिनांक १२/०८/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच गु.रजि.नं २१८/२०२२, २१९/२०२२, २२०/२०२२ दिनांक ०२/०९/२०२२ रोजी असे एकूण ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्यांमधील आरोपी हा संस्थाचालक आहे.
(२) पिडीत मुलींनी बाल कल्याण समिती, ठाणे यांच्याकडे तक्रार दिलेली आहे.
(३) व (४) यापूर्वी संस्थाचालकाविरुध्द कोणीही तक्रार दिलेली नाही. सदर प्रकरणी बाल कल्याण समिती, ठाणे यांच्याकडे तक्रार प्राप्त झाल्याने सदर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. सद्य:स्थितीत आरोपी हा न्यायालयीन कोठडीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. आणि नायर रुग्णालयातील निवासी डॉक्टरांच्या वास्तव्याची म्हाडाची इमारत रिक्त केल्याने डॉक्टरांच्या वास्तव्याचा प्रश्न निर्माण झाल्याबाबत

**(२०) * १५२१६ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दादर (पूर्व) येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. आणि नायर रुग्णालयातील सुमारे २५० निवासी डॉक्टर वास्तव्य करीत असलेल्या म्हाडा इमारतीतील घरे रिकामी करण्याची नोटीस म्हाडा प्रशासनाने पाठविल्याने या डॉक्टरांच्या निवासाचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू इमारतीतील वीज आणि पाण्याची जोडणीदेखील म्हाडा प्रशासनाकडून तोडण्यात आली असल्याने त्यांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, म्हाडाने दिलेल्या माहितीनुसार बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील स्थानिकांना ही इमारत हवी असल्याने नोटीस पाठविली असल्याची बाब समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मे, २०२२ मध्ये नोटीस देण्यात आली त्यावेळी ही इमारत निवासी डॉक्टरांना मार्च, २०२३ पर्यंत वापरण्यात येईल असा निर्णय झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने या इमारती डॉक्टरांच्या निवासाकरीता देण्याबाबत काय चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. आणि नायर रुग्णालयातील निवासी डॉक्टरांच्या वास्तव्याचा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बॉम्बे डाईंग मिल वडाळा येथील संक्रमण शिबिराच्या इमारतीचा ताबा बृहन्मुंबई महानगरपालिकेने एप्रिल, २०२० मध्ये कोविड-१९ च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे तात्पुरत्या निवास व्यवस्थेसाठी/विलगीकरण-कक्ष म्हणून घेतला होता. सध्या या इमारतीचा वापर विलगीकरण कक्ष म्हणून न

होता. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध रूग्णालयातील निवासी डॉक्टरांसाठी निवासस्थान म्हणून होत आहे. कोविड-१९ चा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर सदर इमारत बृहन्मुंबई महानगरपालिकेने रिक्त करून ताब्यात न दिल्यामुळे बी.डी.डी. चाळीमधील रहिवाश्यांचे स्थलांतरण करण्यात अडचणी येत आहेत. यामुळे सदर इमारतीचा ताबा म्हाडाकडे त्वरित देण्याबाबत दिनांक २१/०४/२०२२, दिनांक १९/०९/२०२२ व दिनांक १९/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेस कळविण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिका स्तरावर असा निर्णय घेण्यात आला आहे. तथापि, याबाबत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणास अवगत करण्यात आलेले नाही.

(५) के.ई.एम. व नायर रुग्णालयातील निवासी डॉक्टरांच्या वास्तव्याचा प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्रातून गेल्या दोन वर्षात ६० हजार ४३५ महिला बेपत्ता झाल्याबाबत

**(२१) * १५८४२ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य, महिलांसाठी असुरक्षित असल्याचे वास्तव राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या (एन.सी.आर.बी.) अहवालातून समोर येत असून बेपत्ता नागरिकांच्या यादीत महाराष्ट्रातून गेल्या दोन वर्षात ६० हजार ४३५ महिला बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात गायब झालेल्या एकूण ६० हजार ४३५ महिलांपैकी अद्याप २० हजार ६३० महिलांचे गायब होण्याचे गुढ कायम आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या बेपत्ता महिलांचा तातडीने शोध घेण्यासाठी तसेच अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आळा बसावा यासाठी कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण विभाग (एन.सी.आर.बी.) यांनी प्रकाशित केलेल्या क्राईम इंडिया-२०२१ च्या अहवालानुसार मागील वर्षअखेर बेपत्ता असलेल्या २३१५७ व सन २०२१ मध्ये बेपत्ता झालेल्या ३७२७८ अशी एकूण ६०,४३५ इतकी महाराष्ट्र राज्यातील बेपत्ता महिलांची संख्या असल्याची नोंद आहे.

त्यापैकी सन २०२१ मध्ये ३९८०५ महिला मिळून आल्या असून २०,६३० महिला मिळून येणे बाकी आहेत.

(३) बेपत्ता महिलांचा तातडीने शोध घेण्यासाठी तसेच अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आळा बसावा यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

१. राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

२. लैंगिक शोषणाच्या विळख्यात अडकलेल्या महिलांची सुटका, पुनर्वसन आणि पुर्नएकात्मीकरण करण्यासंदर्भात राज्य सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली आहे.

३. १८ वर्षाखालील हरवलेल्या बालकांच्या बाबतीत थेट अपहरणाचा गुन्हा (FIR) दाखल करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

४. हरवलेल्या बालकांच्या तपासाकरीता नियमित आढावा घेणेबाबत सुधारीत कार्यप्रणाली (SOP) निर्गमित करण्यात आली आहे.

५. व्यापारी लैंगिक शोषणास बळी पडलेल्या पिडीत व्यक्तींची सुटका, न्यायप्रक्रिया व पुनर्वसन करताना पाळावयाच्या शिष्टाचाराबाबत महिला व बालविकास विभागाबाबत नियमावली तयार करण्यात आली आहे. तसेच राज्यस्तरीय कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे.

६. समाजातील दुर्लक्षित महिला व बालके या घटनांबाबत राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोग, नवी दिल्ली तसेच गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्फत प्राप्त सूचनांच्या संदर्भात कार्यवाही करण्याकरीता सर्व पोलीस घटकांना कळविण्यात आले आहे.

७. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध संबंधात भा.द.वि. कलम ३७०, ३७० ए लावणेबाबत व असे गुन्हे करणाऱ्यांविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

८. अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ व भारतीय दंड विधान संहिता १८६० मधील तरतुदींच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत सर्व पोलीस घटकांना कळविण्यात आले आहे.

९. हरवलेल्या बालकांना शोधण्यासाठी ऑपरेशन मुस्कान ही मोहिम सर्व पोलीस घटकांमध्ये प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

१०. अनैतिक मानवी वाहतूकीचे (NCRB) सांख्यिकी माहिती व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध संबंधात सर्व पोलीस घटकांना वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येत आहे.

११. www.trackthemissingchild.gov.in या संकेतस्थळावर अद्ययावत माहिती भरण्याबाबत सर्व घटकप्रमुखांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हेटवणे (ता.रोहा, जि.रायगड) लघु पाटबंधाऱ्यातील कालवे नादुरुस्त असल्यामुळे कालव्याला पाणी सोडण्यात येत नसल्याबाबत

**(२२) * १५३९६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हेटवणे धरणातून सोडण्यात येणाऱ्या आंबेवाडी ते निवीपर्यंतच्या कालव्याला तब्बल आठ ते दहा वर्षांपासून पाणी नसल्यामुळे रोहा (जि.रायगड) येथील कुंडलिका नदीच्या डाव्या तीरावरील व उजव्या

तीरावरील बागायती, भाजीपाला शेती, फळ लागवडीवर विपरीत परिणाम होत असल्याने कालव्यामध्ये पाणी सोडा नाहीतर आंदोलन करण्याचा इशारा कोलाड पाटबंधारे विभागाला दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाटबंधारे विभागाच्या हलगर्जीपणामुळे मे महिन्यात पाण्याअभावी गुराढोरांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवते तसेच बागायती, भाजीपाला शेती देखील पाण्याअभावी सुकत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाटबंधारे विभागाकडून दरवर्षी पाणी सोडण्याचे आश्वासन दिले जाते परंतु कालवे नादुरूस्त असल्यामुळे कालव्यांना पाणी सोडले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कालव्यांना पाणी सोडण्यासाठी तसेच बागायतदार आणि शेतकऱ्यांना दुबार भातशेती, भाजीपाला व फळ लागवडीचे उत्पादन घेण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हेटवणे ही लघु पाटबंधारे योजना नसून मध्यम प्रकल्प आहे.

आंबेवाडी ते निवी कालवा हा हेटवणे मध्यम प्रकल्पाचा भाग नसून काळ मोठा सिंचन प्रकल्पाच्या रोहा शाखा कालव्याचा भाग आहे. सदर कालवा नादुरूस्त असल्यामुळे सिंचनास पाणी सोडण्यात आलेले नाही. कालव्यास पाणी सोडण्याविषयी लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ, शेतकरी तसेच सामाजिक संस्था यांची निवेदने क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झालेली आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

पिण्याच्या पाण्यासाठी जलसंपदा विभागामार्फत थेट कालवा उद्धव घेण्यात येत नाही. ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना राबविण्यात येते.

कालव्याच्या दुरूस्ती अभावी संपूर्ण कालव्यास पाणी सोडणे शक्य होत नाही. तथापि, रोहा शाखा कालवा सा.क्र. ० ते ५ कि.मी. पर्यंत सुस्थितीत असलेल्या कालव्यास पाणी टंचाई कालावधीत माहे एप्रिल ते जून अखेर कालव्यास मागणीनुसार पाणी सोडण्यात येते.

(३) अंशत: खरे आहे.

रोहा शाखा कालवा सा.क्र. ० ते ५ कि.मी. पर्यंत सुस्थितीत असलेल्या कालव्यास पाणी टंचाई कालावधीत माहे एप्रिल ते जून अखेर कालव्यास मागणीनुसार पाणी सोडण्यात येते.

कालवा दुरूस्ती कामे सन २०२२-२३ च्या देखभाल दुरूस्ती अंतर्गत प्रापणसूचीमध्ये मंजूर करण्यात आली असून निविदा प्रक्रिया क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे. तसेच कालव्यातील गाळ काढण्याचे काम यांत्रिकी विभागाच्या मदतीने करण्याचे नियोजन आहे.

(४) हंगामाच्या सुरूवातीस सिंचनाचे पाणी मागणीसाठी जाहीर प्रगटन प्रसिध्दीस दिले असून सिंचनाच्या मागणीनुसार पाणी सोडण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणानंतर पी.एच.डी. परिक्षेकरीता आर्थिक सहाय्य करण्यात येत नसल्याबाबत

**(२३) * १६२०१ श्री.आमश्या पाडवी : दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक १३८२१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी संशोधन तथा प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेची स्थापना इतर समाजाच्या प्रशिक्षण संस्थेच्या आधी म्हणजेच सुमारे ६० वर्षांपूर्वी १९६२ साली होऊनही आदिवासी समाजातील होतकरू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणानंतर पी.एच.डी. परिक्षेकरीता शासनाकडून कोणतेही आर्थिक सहाय्य करण्यात येत नाही तसेच परदेशी शिक्षणासाठी कमी निधी उपलब्ध करून देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बार्टी (२०१३), सारथी (२०१६) आणि महाज्योती (२०१९) इत्यादी संस्थांमार्फत फेलोशिपच्या माध्यमातून त्यांच्या हजारो विद्यार्थ्यांना लाभ देण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी समाजातील विद्यार्थी मुख्य प्रवाहात यावेत याकरीता शासनाने आदिवासी शिक्षण तथा प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे मार्फत आदिवासी समाजातील पी.एच.डी. परीक्षा पात्र ठरलेल्या किमान १००० विद्यार्थ्यांना फेलोशिप देण्याची योजना सुरू करावी, अशी मागणी दोन वर्षापासून विविध संशोधक संघटना आणि सामाजिक संघटनेच्या माध्यमातून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी संशोधन तथा प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी याबाबतचा सविस्तर प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यस्तरावरुन अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना अभिछात्रवृत्ती देणे, ही नवीन योजना प्रस्तावित असून सदर योजनेस मान्यता देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने तसेच राज्यस्तरावरुन अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना अभिछात्रवृत्ती देण्याबाबत शासनाकडून काय निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही.

आदिवासी क्षेत्रामधील सामाजिक व आर्थिक बदलांच्या प्रक्रियेचा व आदिवासी जमातीचा सखोल अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या हेतूने अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकरीता संशोधन अधिछात्रवृत्ती ही योजना राबविण्यात येत आहे.

परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणे या योजनेंतर्गत १० आदिवासी विद्यार्थ्यांची निवड करण्याची तरतूद असून सदर योजनेंतर्गत आजरोजी पर्यंत पुरेशी आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे.

(२), (३) व (४) हे खरे आहे.

(५) व (६) सद्य:स्थितीत सुरू असलेल्या संशोधन अधिछात्रवृत्तीमध्ये अन्य विद्याशाखांचा समावेश करून योजनेचा लक्षांक वाढविणे व अधिछात्रवृत्तीच्या रकमेत सुधारणा करणेबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन असून त्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.

----------------

## पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) संघटनेच्या समर्थकांनी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केल्याबाबत

**(२४) * १५२३६ श्री.महादेव जानकर, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडियाविरोधात (पीएफआय) राष्ट्रीय तपास यंत्रणेने (NIA) देशभरातील अनेक राज्यांमध्ये कारवाई केली असून याविरोधात राज्यात अनेक ठिकाणी पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) कडून आंदोलने करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) संघटनेच्या समर्थकांनी दिनांक २३ सप्टेंबर, २०२२ रोजी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करुन "पाकिस्तान जिंदाबादच्या" घोषणा दिल्या, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात या संघटनेच्या किती कार्यकर्त्यांना पोलिसांनी अटक केली आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अटक करण्यात आलेल्या कार्यकर्त्यांवर व आंदोलकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) पोलीस आयुक्त, पुणे शहर कार्यक्षेत्राच्या हद्दीत दिनांक २३/०९/२०२२ रोजी दुपारी ३ ते ३.३० वाजेपर्यंत पीएफआय संघटनेच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर बेकायदेशीररित्या आंदोलन करुन घोषणा दिल्या आहेत. सदर आंदोलनानंतर समाज माध्यमांवर "पाकिस्तान जिंदाबाद" अशा घोषणा दिल्याचे व्हिडीओ व्हायरल झाले होते. दिलेल्या घोषणांच्या अनुषंगाने समाज माध्यमांवर व्हायरल झालेल्या व्हिडीओचे फुटेज प्राप्त करुन ते तपासणीकरीता न्याय सहाय्यक प्रयोगशाळा, गणेशखिंड रोड, पुणे यांचेकडे पाठविण्यात आले आहे. पाठविण्यात आलेल्या मुद्देमालाची तपासणी होऊन अद्याप परिपूर्ण अहवाल प्राप्त झाला नाही. दाखल गुन्ह्याचा तपास अद्याप चालू आहे.

(३) दहशतवाद विरोधी पथकाने राज्यात या संघटनेच्या २९ जणांना अटक केली आहे.

(४) i. केंद्र शासनाने पीएफआय संघटना व त्यांच्याशी संलग्न संघटनांना बेकायदेशीर संघटना म्हणून घोषित केले आहे.

ii. पीएफआयच्या कार्यकर्त्यांविरुध्द दहशतवाद विरोधी पथकाने बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंधक) कायदा, १९६७ अन्वये स्वतंत्र ५ गुन्हे दाखल करुन २९ आरोपिंना अटक केलेली आहे.

iii. पीएफआय संघटनेच्या ज्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केले त्यांचेविरुध्द प्रतिबंधक कायदेशीर कारवाई केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडे दावे प्रलंबित असल्याबाबत

**(२५) * १६१८१ श्री.रमेश कराड, श्री.नागोराव गाणार, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडे तब्बल १७ हजार १८५ प्रमाणपत्रांचे दावे प्रलंबित असल्याची बाब माहे सप्टेंबर २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समित्यांकडे प्रलंबित असलेले जात वैधता प्रमाणपत्रांचे दावे कधी पर्यंत निकाली काढण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनुसूचित जात वैधता प्रमाणपत्रासंदर्भातील असलेले सर्व प्रलंबित दावे निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) अंशत: खरे आहे.

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडे ऑक्टोबर, २०२२ अखेर पडताळणीकामी एकूण १६०८८ इतकी प्रकरणे प्रलंबित आहेत.

(२) व (३) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांनी त्यांच्याकडे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा नवीन प्रकरणाचा परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर अशा प्रकरणांवर ६ महिन्यांच्या कालावधीमध्ये निर्णय घेण्याच्या सूचना दिनांक २७/०३/२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व समिती कार्यालयांना देण्यात आल्या आहेत. त्यानुषंगाने समित्यांना आवश्यक सर्व सुविधा पुरविण्याबाबत दिनांक २७/०३/२०१९ च्या पत्रान्वये आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना कळविण्यात आलेले आहे. व्यावसायिक व शैक्षणिक अभ्यासक्रमाची प्रकरणे निकाली काढण्यासाठी शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर करण्यात आल्यानंतर विशेष मोहिम राबवुन प्रकरणे विहित कालमर्यादेत निकाली काढण्यात येतात. तसेच जास्त कालावधीची प्रकरणे निकाली काढण्याकरीता ऑक्टोबर, २०१९ पासून गती अभियान राबविण्यात येत आहे. तसेच समित्यांकडील प्रलंबित प्रकरणे, नियमित प्राप्त होणारी नवीन प्रकरणांची संख्या तसेच विविध न्यायालयीन प्रकरणांमध्ये मा.न्यायालयाने पारित केलेले आदेश विचारात घेऊन नविन ७ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी तसेच हिंगोली जिल्ह्यातील पुर्णा नदीवरील चार उच्च पातळी बंधारे बांधण्याबाबत

**(२६) * १५९६३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे : दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १५ मधील प्रश्न क्रमांक १२१०० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी तसेच हिंगोली जिल्ह्यातील पुर्णा नदीवर जोडपरळी, पोटा, पिंपळगांव कुटे आणि ममदापूर येथे उच्च पातळी बंधारे उभारण्याबाबत मा.जलसंपदा मंत्री महोदय यांनी सन २०२१ मध्ये वा त्यादरम्यान घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुर्णा नदीवर हिंगोली जिल्ह्यात जोडपरळी, पोटा व पिंपळगांव कुटे हे तीन उच्च पातळी बंधारे तसेच परभणी जिल्ह्यात पूर्णा नदीवर ममदापूर उच्च पातळी बंधारा असे एकूण चार उच्च पातळी बंधाऱ्यांची अंदाजपत्रके महामंडळ स्तरावरुन प्रशासकीय मान्यतेच्या कार्यवाहीकरीता राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांच्याकडे सादर करण्यात आली आहेत हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अंदाजपत्रकांची छाननी समितीस्तरावर चालू आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुर्णा नदीवरील उपरोक्त चारही उच्च पातळी बंधाऱ्यांच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) पुर्णा नदीवरील परभणी जिल्ह्यातील ममदापुर तसेच हिंगोली जिल्ह्यातील पोटा, जोडपरळी, व पिंपळगांव कुटे या चारही उच्च पातळी बंधाऱ्यांच्या प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावाची छाननी राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांच्यामार्फत प्रगतीपथावर आहे. सदर प्रशासकीय मान्यता प्रस्तावास राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांची शिफारस प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (MWRAA) यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. तद्नंतर सदर प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मान्यता प्रदान करणे शक्य आहे. सदर प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मान्यता प्रदान केल्यानंतर प्रकल्पासाठीचे भूसंपादन, सविस्तर अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता घेणे व निविदा प्रक्रिया पूर्ण करुन निधी उपलब्धतेनुसार क्षेत्रिय स्तरावर कामे चालु करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई पोलीस दलातून सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना शासनाकडून देय रक्कम मिळाली नसल्याबाबत

**(२७) * १५१९० श्री.प्रसाद लाड, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ९५८६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पोलीस दलातून दिनांक ३१ जानेवारी, २०२० पासून आजमितीस (दिनांक ३१ ऑगस्ट, २०२१ अखेरपर्यंत) च्या कालावधीमध्ये पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक या पदावरून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या बहुसंख्य पोलीस कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन, निवृत्ती उपदान (ग्रॅच्युइटी), शिल्लक राहिलेल्या रजेचे वेतन, भविष्यनिर्वाह निधीमधील अंतिम रक्कम, गट विमा योजनेची रक्कम, सातव्या वेतन

आयोगामध्ये देय असलेली रक्कम आदी शासनाकडून देय असलेली देणी आजमितीस अदा करण्यात आली नसल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत असून त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने त्यांच्यामध्ये तीव्र असंतोष पसरला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरहू सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन व इतर देय असलेली देणी शासनाकडून लवकरात लवकर मिळावीत यासाठी प्रशासनाकडे वारंवार जावे लागते तरीही दखल घेतली जात नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई पोलीस दलातून दिनांक ३१ जानेवारी, २०२० पासून दिनांक ३१ ऑगस्ट, २०२२ अखेरपर्यंतच्या कालावधीमध्ये पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक या पदावरून नियत वयोमानानुसार एकूण किती पोलीस कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत व त्यापैकी आजमितीस (दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ अखेरपर्यंत) किती निवृत्तीवेतनाधारकांना सेवानिवृत्तीवेतन तसेच इतर देय असलेली देणी अदा करण्यात आलेली आहेत तसेच उर्वरित बहुसंख्य निवृत्तीवेतनाधारकांना शासनाकडून देय असलेली देणी अदा करण्यास विलंब झाला आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई पोलीस दलातून निवृत्त झालेल्यांना सेवा निवृत्तीवेतन लागू करण्यास होत असलेल्या विलंबाबाबत तसेच त्या सेवानिवृतीनंतरच्या देय असलेली देणी प्रत्यक्षात अदा करण्यास होत असलेल्या विलंबासंदर्भात आजमितीस नियमितपणे आढावा घेण्यात आला आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना विनाविलंब सेवानिवृत्ती वेतन लागू होण्याच्या दृष्टीने तसेच त्यांना सेवानिवृत्तीनंतर विविध प्रकारची देय असलेली रक्कम अदा होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) माहे ३१ जानेवारी, २०२० ते ३१ ऑगस्ट, २०२१ या कालावधीत एकूण २५७७ सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांपैकी २३२१ सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकाची पडताळणी झालेली असून २५६ कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके वेतनपडताळणी अभावी प्रलंबित आहेत. कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे, शासनाने दिनांक २०/०३/२०२० पासून राज्यात लॉकडाऊन जाहीर केल्यामुळे कार्यालयातील उपस्थिती मर्यादित करण्यात आली होती. त्यामुळे वेतनपडताळणी पथकास सादर केलेल्या सेवापुस्तकांची पडताळणी न झाल्यामुळे तसेच महालेखापाल कार्यालयास सादर केलेली प्रकरणेही मंजूर न झाल्यामुळे सदर प्रकरणे प्रलंबित आहेत.

सदर प्रकरणांचा त्वरेने निपटारा होण्याकरीता पोलीस आयुक्त बृहन्मुंबई कार्यालय येथे वेतन पडताळणी पथकाची स्थापना करून २०२०-२०२१ पर्यंतची सेवापुस्तक प्रमाणित करून घेण्यात आली आहेत. त्यांना तात्पुरते निवृत्तीवेतन व तात्पुरते उपदान अदा करण्यात आले आहे. सदरच्या कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी मधील अंतिम रक्कम व गट विमा योजनेची रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

तसेच उपरोक्त कालावधीतील एकूण २५७७ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांपैकी २३२१ कर्मचाऱ्यांना नियमित निवृत्तीवेतन, २३१९ कर्मचाऱ्यांना सेवा-नि-उपदान, २४०३ कर्मचाऱ्यांना रजा सममूल्य वेतन, २५६९ कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी मधील अंतिम रक्कम व २५५६ कर्मचान्यांना गट विमा योजनेची रक्कम असे सेवानिवृत्तीनंतरचे सर्व लाभ अदा करण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

मुंबई पोलीस दलातून दिनांक ३१ जानेवारी, २०२० पासून दिनांक ३१ ऑगस्ट, २०२२ अखेरपर्यंतच्या कालावधीमध्ये पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक या पदावरून नियतवयोमानानुसार ३९०५ पोलीस कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत. दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ पर्यंत ३९०५ पैकी २९९३ पोलीस कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन, ३८७९ पोलीस कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीची रक्कम, ३७५६ पोलीस कर्मचाऱ्यांना गट विमा योजनेची रक्कम, २९४६ पोलीस कर्मचाऱ्यांना सेवा-नि-उपदान ची रक्कम, तसेच २९९३ पोलीस कर्मचाऱ्यांना रजा सममुल्य वेतनाची रक्कम देण्यात आली आहे.

(४) मुंबई पोलीस दलातून निवृत्त झालेल्यांना सेवा निवृत्तीवेतन लागू करण्यास होत असलेल्या विलंबाबाबत वेळोवेळी पोलीस उप आयुक्त, मुख्यालय-१ व पोलीस सह आयुक्त, (प्रशासन) यांच्या दालनात आढावा बैठक घेण्यात येते.

(५) मुंबई पोलीस मुख्यालयामार्फत सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना विनाविलंब सेवानिवृत्ती वेतन लागू होण्याच्या दृष्टीने विशेष वेतन पडताळणी पथक स्थापन करण्यात आले होती.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील सहकारी पाणीपुरवठा संस्थांकडून वाढीव दराने बिल आकारणी करण्यात येत असल्याबाबत

**(२८) * १५३६९ श्री.अरुण लाड, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील सहकारी पाणीपुरवठा संस्थांना १ रुपया १६ पैसे दराने वीज बिलाची आकारणी करण्याचे नियम असतानाही वीज बिलात इंधन समायोजन म्हणून ६५ पैसे प्रति युनिट दराने वाढीव बिल दिनांक १५ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास आकारण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य इरिगेशन फेडरेशनच्यावतीने सन १९९५ पासून शेतीपंप व सहकारी पाणीपुरवठा संस्थांना वीज दरामध्ये सवलत दिलेली असताना वाढीव दराने वीज बिले देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने सदर वाढीव बिले रद्द करुन सवलतीच्या दराने वीज देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.११८/ऊर्जा-५, दिनांक २५/०८/२०२२ नुसार राज्यातील अतिउच्चदाब, उच्चदाब उपसा जलसिंचन योजना ग्राहकांना रुपये १.१६ प्रति युनिट व लघुदाब उपसा जलसिंचन योजना ग्राहकांना रुपये १ प्रति युनिट सवलतीच्या दराने वीज बिलाची आकारणी करण्यात येत आहे. या व्यतिरिक्त मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिनांक ०१/०७/२०२२ च्या आदेशान्वये मार्च, २०२२ ते मे, २०२२ या कालावधीचा इंधन समायोजन आकार रुपये ७९०४ कोटीच्या वसुलीला पुर्व मंजुरी

दिली. त्यानुसार जून, २०२२ ते ऑक्टोबर, २०२२ या वीज देयक महिन्यात इंधन समायोजन आकार सर्व ग्राहकांना लागू करण्यात आला. त्यापैकी सहकारी पाणीपुरवठा संस्थांना रुपये ६५ पैसे प्रति युनिट इतका इंधन समायोजन आकार लागू करण्यात आला.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) येथील एकात्मिक आदिवासी विभागाला स्वतंत्र अधिकारी आणि उपविभागीय अधिकारी देण्याबाबत

**(२९) * १५६०९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पालघर जिल्ह्यामधील आदिवासी भागाचा विकास साधण्यासाठी डहाणू येथील एकात्मिक आदिवासी विभागाला स्वतंत्र अधिकारी आणि उपविभागीय अधिकारी देण्याबाबतची मागणी स्थानिकांकडून होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डहाणू आणि तलासरी हे तालुके सीमाभागात असून आदिवासी बहुल असल्याने विकासापासून वंचित असतानाही या तालुक्यांच्या विकासासाठी कोणता आराखडा शासनाने तयार केला आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर तालुक्यांच्या विकासाचा आराखड्याबाबत तसेच एकात्मिक आदिवासी विभागाला स्वतंत्र अधिकारी व डहाणू उपविभागीय अधिकारी देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे आहे.

(२) डहाणू व तलासरी आदिवासी भागामध्ये विविध शासकीय विभाग/यंत्रणांकडून राज्यस्तर व जिल्हास्तरावर विविध विकासाच्या योजना राबविण्यात येत आहेत.

अ) पालघर जिल्हा आदिवासी घटक कार्यक्रम सन २०२१-२२ करीता आदिवासी उपयोजना क्षेत्र असलेले (TSP) डहाणू व तलासरी तालुक्यांकरीता (अंशत: पालघर तालुका) विविध विकास कामांसाठी रुपये १४८.९८ कोटी व सन २०२२-२३ करीता रुपये १५९.६० कोटी इतकी तरतुद करण्यात आली आहे.

ब) केंद्रीय योजनेंतर्गत भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) व विशेष केंद्रीय सहाय्य योजना, आदिम जमाती विकास व संरक्षण योजना इ. योजनेंतर्गत देखील सदर तालुक्यांना लाभ देण्यात आलेला आहे. या विभागामार्फत प्रधानमंत्री आदि आदर्श ग्राम या केंद्रीय योजनेंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरुन ग्रामसभेच्या मान्यतेने ग्रामविकास आराखडे तयार करण्यात येत आहेत. सदर योजनेंतर्गत डहाणू तालुक्यात एकूण ११६ गावांचा व तलासरी तालुक्यातून ४० गावांचा समावेश आहे.

क) केंद्रवर्ती अर्थसंकल्प न्युक्लीअस बजेट योजनेतंर्गत सन २०२१-२०२२ व २०२२-२०२३ मध्ये उत्पन्न वाढीच्या योजना, प्रशिक्षणाच्या योजना, मानव विकास संसाधन योजना राबविण्यात आल्या असून त्यातून डहाणू व तलासरी तालुक्यातील सन २०२१-२०२२ मध्ये १२,९९६ लाभार्थी आहेत व सन २०२२-२०२३ मध्ये २,०८१ लाभार्थींना लाभ देण्यात आलेला आहे.

(३) आदिवासी विकास विभागातील ११ अतिसंवेदशील प्रकल्प कार्यालयांकरीता पूर्णवेळ व अनुभवी भा.प्र.से.अधिकारी देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागास विनंती करण्यात आली होती. तथापि, सदर विनंती मान्य करता येणार नाही असे सामान्य प्रशासन विभागाने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव (जि.जळगांव) येथे स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक यांचेवर आक्षेपार्ह विधान केल्याप्रकरणी कारवाई करण्याबाबत

**(३०) * १५२८५ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव (जि.जळगांव) येथे स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक यांनी मराठा समाजाविषयी आक्षेपार्ह विधान करुन मराठा समाजाचा अवमान केल्याची तक्रार दिनांक १५ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास जिल्हा पेठ, जळगाव पोलीस ठाण्यात केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) श्री.किरणकुमार बकाले, तत्का.पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव यांनी मराठा समाजाविषयी आक्षेपार्ह विधान केल्याप्रकरणी प्राप्त तक्रारीवरुन विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांनी आदेश दिनांक १४/०९/२०२२ अन्वये शासकीय सेवेतून तात्काळ निलंबित केले आहे.

सदर प्रकरणी दिनांक १५/०९/२०२२ रोजी तक्रारदार श्री.विनोद पंजाबराव देशमुख, रा. जळगांव यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जिल्हापेठ पोलीस स्टेशन भाग-५, गु.र.नं.५५१/२०२२ भा.दं.वि. क्र.१५३(अ)(ब)१६६, २९४, ३५४(अ), ५००, ५०१ अन्वये पोलीस निरीक्षक श्री.किरणकुमार बकाले यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सद्य:स्थितीत तो तपासाधीन आहे.

याप्रकरणी करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीच्या अहवालानुसार विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांच्या दिनांक १३/१०/२०२२ रोजीच्या आदेशान्वये श्री.किरणकुमार बकाले, तत्कालीन पोलीस निरीक्षक यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित केली असून सदर विभागीय चौकशी अपर पोलीस अधीक्षक, धुळे यांचेकडे आजमितीस सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बीडीडी चाळीचा पुनर्विकास करण्याबाबत

**(३१) * १५३०१ श्री.सचिन अहिर, श्री.अंबादास दानवे : तारांकित प्रश्न क्रमांक १३३८७ ला दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील वरळी, नायगांव, ना.म.जोशी मार्गावरील १०० वर्षांपूर्वीच्या बीडीडी चाळीची पुनर्बांधणी करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून वरळी, नायगाव येथील बीडीडी चाळ पुनर्विकास म्हाडामार्फत करण्यासाठी तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांच्या हस्ते दिनांक २२ एप्रिल, २०१७ रोजी भूमिपूजन करुनही नायगाव येथील बीडीडी चाळीचा पुनर्विकासाची सुरवात म्हाडाने न केल्याने प्रकल्पाच्या खर्चात तीस टक्क्यांनी वाढ झाल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पुनर्बांधणीचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे, या पुनर्बांधणीत मूळ रहिवाशांना किती चौ.फूटाचे घर शासनातर्फे बांधून देण्यात येणार आहे, सदर चाळीचे बांधकाम किती वर्षात पूर्ण करण्यात येणार आहे तसेच बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पात पोलिसांना रुपये १५ लाखात घर देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तेथील रहिवाश्यांनी तसेच लोकप्रतिनिधी, त्याचप्रमाणे सामाजिक संघटनेने १५ वर्षाचा कॉर्पस फंड मिळण्याबाबत राज्य शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईतील बीडीडी चाळीचे पुनर्विकास प्रकल्प म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी जाणीवपुर्वक दुर्लक्ष केल्याने म्हाडाला रुपये साडेतीन कोटींचे नुकसान होत असून खाजगी कंपन्यांना जमीन विक्री करण्याचा व बीडीडी चाळींचा विकास करण्याचा पर्याय शासनाच्या विचाराधीन आहे त्याचप्रमाणे नायगाव येथील बीडीडी चाळीच्या पुनर्विकासाबाबत शासनाने किती निधीची तरतुद केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने बीडीडी चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत दिरंगाई करणाऱ्या म्हाडाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन बीडीडी चाळीत राहणाऱ्या नागरिकांना व पोलिसांना घरे मिळण्यासाठी चाळींचे पुनर्विकास प्रकल्पाचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) बी.डी.डी. चाळीमधील पात्र रहिवाशांना पुनर्विकसित इमारतीमध्ये ५०० चौ.फूट चटई क्षेत्रफळाची निवासी सदनिका विनामूल्य देण्यात येणार आहे.

वरळी येथील पुनर्वसन इमारतींचे बांधकाम ८ वर्षात, नायगांव व ना.म.जोशी मार्ग येथील पुनर्वसन इमारतींचे बांधकाम ७ वर्षात पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

शासनाने बी.डी.डी. चाळ पुनर्विकास प्रकल्पात पोलिसांना रुपये १५ लाखात घर देण्याचा निर्णय दिनांक ३०/०८/२०२२ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.
(३) पुनर्वसन इमारतींच्या देखभालीचा खर्च १२ वर्षे म्हाडातर्फे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(४) मुंबईतील बी.डी.डी. चाळींचे पुनर्विकास प्रकल्प राबविण्यात म्हाडा अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले गेले, हे खरे नाही.

बी.डी.डी. चाळ पुनर्विकास प्रकल्पामध्ये म्हाडाला सद्य:स्थितीत विक्री घटकांची विक्री झाल्यानंतर नफा होणे अपेक्षित आहे.

बी.डी.डी. चाळींतील रहिवाशांकरीता पुनर्वसनासाठी लागणारी जमीन/इमारत खाजगी कंपन्यांना विक्री करण्याचा पर्याय विचाराधीन नाही.

बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासासाठी सन २०२२-२३ व सन २०२३-२०२४ साठी आवश्यक निधीची तरतूद म्हाडाने केली आहे.

(५) वरळी येथील ३१९ रहिवाशी संक्रमण शिबिरात स्थलांतरित झाले आहेत. पुनर्वसन इमारत क्र.१ मधील ८ विंगपैकी ६ विंगचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

नायगांव येथील बी.डी.डी. चाळींमधील ५२२ रहिवाशांना म्हाडाच्या संक्रमण शिबिरामध्ये स्थलांतरित करण्यात आले असून अद्यापपर्यंत ६ चाळी तोडण्यात आल्या आहेत.

ना.म.जोशी मार्ग येथील बी.डी.डी. चाळींमधील ५४६ रहिवाशांना म्हाडाच्या संक्रमण शिबिरामध्ये स्थलांतरित करण्यात आले असून अद्यापपर्यंत ३ चाळी तोडण्यात आल्या आहेत.

पुनर्विकासाच्या पहिल्या टप्यात चाळींतील रहिवाशी संक्रमण शिबिरात स्थलांतरित होऊन चाळी रिक्त न झाल्यामुळे पुनर्विकासाचे काम सुरु करता आले नाही व प्रकल्प सुरु करण्यास विलंब झाला. आता नायगांव व ना.म.जोशी मार्ग येथील बी.डी.डी. चाळी तोडण्यात आल्या असून रिक्त जागेवर प्रस्तावित पुनर्वसन इमारतीचे काम सुरु करण्यात आले आहे.

-----------------

## मांजरा धरण (जि.बीड) प्रकल्पाचे व्यवस्थापनाच्या कामकाजासाठी मंजूर केलेली पदे भरण्याबाबत

**(३२) * १६५५५ श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर, उस्मानाबाद व बीड जिल्ह्यासाठी मांजरा धरण प्रकल्प हा महत्वाचा असून या प्रकल्पाच्या कामासाठी शासनाने २२ पदे मंजूर केली असून ती केवळ कागदोपत्रीच असून मागील आठ-दहा वर्षांपासून कायमस्वरुपी अभियंता नसल्यामुळे तेथील व्यवस्थापन तीन अधिकाऱ्यांना पहावे लागत असल्याचे दिनांक ५ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे धरणाच्या व्यवस्थापनासह सिंचनाचे नियोजनावर देखील त्याचा परिणाम होत असल्याने अनेक शेतकऱ्यांना पाणी मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मंजूर पदांवरील नियुक्त्यांबाबत व कायमस्वरुपी शाखा अभियंता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे. मंजूर पदांपेक्षा कमी संख्येने कर्मचारी कार्यरत आहेत. तथापि, अन्य कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे व शेतकऱ्यांच्या मागणीनुसार प्रकल्पातील पाणीसाठ्याचे नियोजन करुन पाणी आवर्तन सुरळीतपणे राबविण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहे.

(३) व (४) मांजरा धरण प्रकल्पासाठी कनिष्ठ अभियंता संवर्गाचे पद मंजूर असून या संवर्गाची रिक्त पदे पदोन्नतीने व थेट पदभरतीद्वारे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील आदिवासी विभागातील आश्रमशाळांमध्ये किराणा पुरवठ्याची देयके ई-निविदेअभावी निघत असल्याबाबत

**(३३) * १५६८६ श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील आदिवासी विभागातील आश्रमशाळांमध्ये सात दिवसांचा किराणा पुरवठ्यासाठी ई-निविदा न काढता किराणा पुरवठ्याची लाखो रुपयांची देयके काढण्यात येत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,आश्रमशाळांतील मुख्याध्यापकांना रुपये ५० हजार रुपयांपर्यंत खरेदीचे अधिकार असतानाही लाखो रुपयांची देयके काढण्यात येत असल्याने याबाबत आदिवासी विभागाने कोणती सखोल चौकशी केली आहे तसेच चौकशीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी विभागाने केलेल्या चौकशीचा अहवाल प्राप्त होण्याबाबत तसेच संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

शासकीय आश्रमशाळेतील मुख्याध्यापक यांना शासन निर्णय आदिवासी विकास विभाग, दिनांक १६/०९/२०१३ मधील तरतुदीनुसार रुपये ५० हजार पर्यंत खरेदीचे अधिकार आहेत.

शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना भोजनासाठी लागणारे अन्नधान्य, कडधान्य, किराणा माल व मसाले पदार्थ शाळास्तरावर पुरवठा करणेसाठी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या स्तरावरुन ई-निविदा प्रक्रिया सुरु आहे.

शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची भोजनाची गैरसोय होऊ नये या दृष्टीने शासन निर्णय आदिवासी विकास विभाग, दिनांक २२/०५/२००६ मधील तरतुद विचारात घेऊन तातडीची बाब म्हणुन सात दिवस पुरेल एवढे अन्नधान्य, कडधान्य, किराणा माल व मसाले पदार्थ खरेदी करुन शाळास्तरावर पुरविणेबाबत नियोजन करण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी दिनांक ०५/०७/२०२२ पत्रान्वये सर्व प्रकल्प अधिकारी यांना कळविले आहे. त्यानुसार प्रकल्प अधिकारी/मुख्याध्यापक यांचे स्तरावर अंमलबजावणी करण्यात येत असून देयके अदा करतांना प्रकल्प अधिकारी यांची मंजुरी घेण्यात येत आहे. सद्य:स्थितीत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक स्तरावरुन अन्नधान्य, कडधान्य, किराणा माल व मसाले पदार्थांचा पुरवठा करणेबाबतची ई-निविदा राबविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## अहमदनगर जिल्ह्यात माहिती तंत्रज्ञान विषयक गुन्हे स्थानिक पोलीस ठाणे नोंदवून घेत नसल्याबाबत

**(३४) * १५९१९ डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात माहिती तंत्रज्ञान विषयक गुन्हे सर्व पोलीस ठाण्यांमध्ये दाखल करण्याचे आदेश असतानाही असे गुन्हे दाखल करण्यासाठी जिल्ह्यातील तक्रारदारांना अहमदनगर येथील सायबर क्राईम पोलीस ठाण्यात पाठविले जात असल्याचे दिनांक ०५/०९/२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे तक्रारदारांची हेळसांड व गैरसोय होत असून त्यांना जिल्ह्याच्या ठिकाणी येण्यासाठी अनावश्यक पैसा व वेळ खर्च करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून सदर गुन्हे स्थानिक पोलीस ठाण्यातही नोंदविले जावेत यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. अहमदनगर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत २३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही. तथापि, तांत्रिकदृष्टया क्लिष्ट स्वरूपाचे आणि मोठ्या आर्थिक फसवणुकीचे गुन्हे सायबर पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे दाखल केले जातात.

(३) सायबर पोलीस स्टेशन, अहमदनगर मार्फत अहमदनगर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यातील प्रभारी अधिकारी यांना माहिती तंत्रज्ञान कायद्यासंदर्भातील गुन्हे संबंधित पोलीस स्टेशनला नोंदविण्याबाबत लेखी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच मासिक आढावा बैठकीमध्येही सूचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धर्मादाय रुग्णालयात निराधार आणि आर्थिकदृष्ट्या दृष्ट्या दुर्बल रुग्णांना वैद्यकीय उपचार मिळण्याबाबत

**(३५) * १५१२१ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ‘बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट, १९५०’ अंतर्गत धर्मादाय/ट्रस्टच्या रुग्णालयांनी समाजातील सर्व घटकांना अतितातडीच्या सेवा, तर समाजातील दुर्बल घटकांसाठी मोफत अथवा अतिशय वाजवी किंमतीत गुणवत्तापूर्वक आरोग्यसेवा दिली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कायद्याच्या तरतुदींनुसार रुग्णालयातील १० टक्के खाटा निराधार रुग्णांसाठी मोफत आणि १० टक्के खाटा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी सवलतीच्या दरात उपलब्ध करण्यात येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील बहुतांश रुग्णालयांकडून या कायद्यातील तरतुदींचे पालन केले जात नसून खाटांच्या उपलब्धततेची माहिती रुग्णालयांच्या संकेतस्थळावर जाहीर केली जात नसल्याने गरजूंना धर्मादाय रुग्णालयात या योजनेंतर्गत खाटा व वैद्यकीय उपचार मिळविण्याकरीता अनेक समस्या उद्‌भवत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने धर्मादाय रुग्णालयात निराधार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना सहज आणि सुलभतेने वैद्यकीय उपचार मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.
(३) नाही.

धर्मादाय रुग्णालये मा.उच्च न्यायालयीन योजनेच्या खंड २ नुसार निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी खाटा आरक्षित ठेवतात.

तसेच, बहुतांश रुग्णालय खाटांच्या उपलब्धतेबाबतची माहिती धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे संकेतस्थळ charity.commissioner.gov.in यावर दररोज जाहीर करतात. तथापि, काही रुग्णालये खाटांची स्थिती दर्शविणारी माहिती संकेतस्थळावर अद्ययावत करीत नाही. अशा धर्मादाय रुग्णालयांना वेळोवेळी संबंधित धर्मादाय आयुक्त कार्यालयातून पत्राद्वारे तसेच दुरध्वनीद्वारे संपर्क करुन कळविण्यात येते व त्यांची माहिती संकेतस्थळावर अद्ययावत केली जाते. तसेच, धर्मादाय रुग्णालये त्यांच्या दर्शनी भागावर खाटांबाबतच्या सद्य:स्थितीचा फलक लावतात. खाटांची अद्ययावतता संकेतस्थळावर उपलब्ध नसल्याने लाभार्थींना मा.उच्च न्यायालयीन योजनेंतर्गत वैद्यकीय उपचार मिळण्याकरीता अनेक समस्या उद्‌भवत आहेत, ही बाब निदर्शनास आलेली नाही.
(४) धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे संकेतस्थळावर (charity.maharashtra.gov.in) खाटांबाबतची माहिती वेळोवेळी अद्ययावत केली जाते. सदर संकेतस्थळावर धर्मादाय रुग्णालयांची माहिती, संपर्क क्रमांक तसेच खाटा उपलब्धतेबाबतची माहिती प्रदर्शित करण्यात येते व ती अद्यायावत केली जाते. तसेच धर्मादाय रुग्णालयाच्या दर्शनी भागावर खाटांच्या उपलब्धतेबाबतचा फलक, योजनेचा फलक, संपर्क व्यक्तीचे नांव व संपर्क क्रमांक यांचे फलक लावण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर एसआरए गृहनिर्माण सहकारी संस्था, चेंबूर (मुंबई) येथील एसआरए योजनेत विकासकांनी निकृष्ट दर्जाचे काम केल्याबाबत

**(३६) * १५४०८ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर एसआरए गृहनिर्माण सहकारी संस्था, चेंबूर, मुंबई येथील सीटीएस नं. १४८० या जागेवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत असलेल्या इमारतीचे बांधकाम पूर्ण न करता २७० पेक्षा जास्त सदनिका धारकांना सदनिका वितरीत करण्यात आली आहे, या योजनेंतर्गत असलेल्या सदनिकाधारकांना भाडेपोटी देय असलेली लाखो रूपयांची थकबाकी विकासकांनी थकविली असून

भाड्यासाठी सदनिकाधारकांना विकासक/एसआरए कार्यालयात वारंवार मागणी करूनही अद्यापि थकबाकी मिळाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विकासकांनी इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे केले असून बऱ्याच सदनिकांमध्ये पाण्याची गळती होत आहे, इमारतीचे बांधकाम अर्धवट केल्यामुळे परिसरात अस्वच्छता असून पाणी साचल्याने सदनिका धारकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाचे काम केलेल्या विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

मौजे चेंबूर येथील न.भू.क्र.७०८(भाग), ७०९, ७०९/१ ते ११, ७१०, ७१०/१ ते २३, ७११, ७११/१ ते १४, ७१२, ७१२/१ ते ७, ७१५, ७१५/१ ते ३६, ७१५/३७, ७१६ आणि निळा मुठा लाईन या भूभागावरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सह.गृह.संस्था मर्या. झो.पु. योजनेतील पुनर्वसन इमारतीत एकूण २७४ रहिवाशी सदनिका, १ संयुक्त, वाणिज्य-०८ व ६ सुविधा सदनिका याप्रमाणे एकूण २८९ सदनिकांना बांधकाम परवानगी देण्यात आली होती. या इमारतीला दिनांक ०८/०४/२०२२ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे. सदर योजनेतील एकूण २३४ सदनिकांचे वाटप झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत करण्यात आले आहे.

या व्यतिरिक्त योजनेचे विकासक मे.वर्धन हौसिंग यांनी पात्रता निश्चित झाल्यानंतर एकूण २१ झोपडीधारकांना सदनिका वाटप करण्याबाबतचा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास सादर केलेला आहे. सदर प्रस्तावानुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तसेच या योजनेत भाडे मिळाले नसल्याबाबत एकूण १३७ झोपडीधारकांचे अर्ज प्राप्त झाले होते. भाडे न दिल्यामुळे सदर योजनेच्या विक्री घटकातील बांधकामास दिनांक २२/०९/२०२२ रोजी काम थांबवा (Stop Work) आदेश देण्यात आलेले आहेत.
(२) पुनर्वसन इमारतीमधील काही सदनिकांमध्ये गळतीबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून दिनांक १०/११/२०२२ रोजी स्थळपाहणी करण्यात आली असून, स्थळपाहणीअंती दिनांक २२/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये विकासकास तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार विकासकामार्फत दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) येथील गॅस वीज प्रकल्पासाठी गेल कंपनी कडून गॅसचा पुरवठा कमी प्रमाणात होत असल्याबाबत

**(३७) * १५३८४ श्री.अनिकेत तटकरे, श्री.सचिन अहिर, श्री.शशिकांत शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ७०३३ ला दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) येथील गॅस वीज प्रकल्पाची वीजनिर्मिती क्षमता ६७२ मेगावॅट इतकी असून त्यासाठी दररोज ३.५ दशलक्ष घनमीटर गॅस पुरविण्याबाबत गेल कंपनीसोबत शासनाने करार केलेला असल्याचे माहे जुलै, २०२२ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल (जीएआयएल) कंपनीकडून ३.५ दशलक्ष गॅस पुरवठा करण्याऐवजी एक ते दीड दशलक्ष घनमीटर म्हणजे निम्म्यापेक्षाही कमी प्रमाणात गॅस पुरविण्यात येत असल्यामुळे सरासरी पन्नास टक्क्यांपर्यंत वीज निर्मिती होत असताना देखील ग्राहकांना मात्र आर्थिक भार पूर्णत: सोसावा लागत असल्याचे दिनांक २४ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वीज करारातील तरतुदीनुसार स्थापित वीज निर्मिती निम्मी झाली तरी शासनाने (महावितरण कंपनी) स्थिर आकाराची पूर्ण रक्कम म्हणजे वर्षाला १८९ कोटी देणे शासनावर बंधनकारक असल्याचे महानिर्मिती कंपनीचे मा.संचालक (संचलन) यांनी त्याच सुमारास सांगितल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गेल कंपनीकडून प्रत्यक्षात मिळणारा गॅस व अदा करावी लागणारी पूर्ण रक्कम विचारात घेता, शासनाने गेल कंपनीसोबत सुधारित करारनामा करावा अशी राज्यातील वीज ग्राहकांनी व सामाजिक संस्थांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, त्यानुसार शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गेल कंपनीसोबत सुधारित करारनामा करण्याबाबत तसेच उरण वायू विद्युत निर्मिती केंद्राची अधिक कार्यक्षम संचासहीत पुन:उभारणी (Retrofitting) करून विद्युत निर्मिती केंद्र करणे, वायूउपलब्धतेनुसार नवीन CCPP संचांची उभारणी करणे इ. च्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी सल्लागार कंपनीची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) उरण वायु विद्युत निर्मिती केंद्राची अधिक कार्यक्षम संचासहित पुन:उभारणी (retrofitting) करुन विद्युत निर्मिती केंद्र करणे, वायु उपलब्धतेनुसार नवीन CCPP संचांची उभारणी करण्याच्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी मेसर्स स्टिग एनर्जी सर्विसेस (इंडिया) प्रा.लि. सल्लागार कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खडक्या (ता.धडगाव, जि.नंदुरबार) येथे आदिवासी महिलेवरील बलात्कार व हत्या प्रकरणाची चौकशी करण्याबाबत

**(३८) * १६००२ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.सुधीर तांबे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, ॲड.अनिल परब, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडक्या (ता.धडगाव, जि.नंदुरबार) येथे एका आदिवासी महिलेचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार करून हत्या करण्यात आल्याची घटना दिनांक १ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तसेच तिचा मृतदेह अंदाजे दीड महिना मिठाच्या खड्डयात पुरुन ठेवला व त्यानंतर कुटुंबियांच्या तक्रारीवरुन शवविच्छेदन विलंबाने केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणात स्थानिक पोलिसांनी सदरील गुन्हयांची नोंद आत्महत्या म्हणून केली असून, संबंधित पोलिसांचे वर्तन संशयास्पद असून या सर्व प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी पिडीत मुलीच्या कुटुंबियांनी तसेच लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी पोलीस अधिकारी, वैद्यकीय अधिकारी तसेच आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन धडगाव पोलीस ठाणे, जि.नंदुरबार येथे गु.र नं. २०७/२०२२, भादवि कलम ३०६, ३४ अन्वये दिनांक ०२/०८/२०२२ रोजी आत्महत्येस प्रवृत्त केल्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला होता.सदर गुन्ह्यात एकूण ०४ आरोपी असून ०१ विधीसंघर्षीत बालक आहे. तपासाअंती भादवि कलम ३०६, ३७६ (अ)(ड), ३५४, ३६३ आणि ३४ अन्वये मा.न्यायालयात दिनांक ३१/१०/२०२२ रोजी दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.
(२) दिनांक ०२/०८/२०२२ रोजी गुन्हा दाखल झाल्यानंतर मयत हिचेवर धडगांव ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले होते. फिर्यादी यांचा वैद्यकीय अधिकारी यांनी केलेल्या शवविच्छेदनाबाबत आक्षेप होता.फिर्यादीने केलेल्या मागणी व अर्जानुसार दिनांक १२/०९/२०२२ रोजी मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धडगांव यांच्या परवानगीने पुन्हा शवविच्छेदन करण्यात आले.
(३) व (४) फिर्यादीने केलेल्या मागणी व अर्जानुसार दिनांक १२/०९/२०२२ रोजी मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धडगांव यांच्या परवानगीने पुन्हा शवविच्छेदन करण्यात आले. यामध्ये मृत्यूचे अंतिम कारण “ASPHYXIA DUE TO HANGING WITH EVIDENCE OF DECOMPOSITION (un-natural)” असे नमूद केले आहे. सदर प्रकरणी पोलीस ठाण्याचे तत्कालीन प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक व तत्कालीन तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक यांना तात्काळ निलंबित करण्यात आले असून त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी करण्याची कार्यवाही सुरु आहे. वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, धडगाव यांनी केलेल्या प्रथम शवविच्छेदनाची चौकशी करण्याकरीता जिल्हा शल्यचिकित्सक, नंदुरबार यांच्या स्तरावर त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशी समितीने दिनांक ३०/११/२०२२ रोजी अहवाल सादर केला असून पुढील कार्यवाही सुरु आहे. सदर गुन्ह्याचा तपास विशेष तपास पथक यांचेमार्फत करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उजनी धरण (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) लाभक्षेत्रातील कालव्याच्या देखभाल दुरुस्तीबाबत

**(३९) * १५११३ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उजनी धरण (ता.पंढरपूर, सोलापूर) लाभक्षेत्रातील उजवा डावा कालवा वितरिका क्रमांक ४२ वरील मायनर ७, ८ व ९ हे गेल्या दहा वर्षापासून देखभाल दुरुस्ती अभावी अत्यंत दयनीय अवस्थेत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे उजनी धरणात पाणी असून देखील जिल्ह्यातील हजारो हेक्टर क्षेत्र पाण्यापासून वंचित आहे त्यामुळे उजनी धरण वितरिका देखभाल दुरुस्तीसाठी योग्य त्या उपाययोजना करण्याची मागणी लोकप्रतिनिधी व पदाधिकारी यांनी माननीय उपमुख्यमंत्री महोदय यांच्याकडे दिनांक १५ सप्टेंबर, २०२२ रोजी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उजनी धरण वितरिका देखभाल दुरुस्तीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

सदर वितरिका क्र.४२ वरील लघु वितरिका क्रमांक ७, ८ व ९ येथे पाणी वापर संस्था कार्यरत असल्यामुळे सदर क्षेत्रावर विभागामार्फत देखभाल दुरूस्तीचा खर्च करण्यात येत नाही.

(२) उजनी धरणात पाणी असून देखील जिल्ह्यातील हजारो हेक्टर क्षेत्र पाण्यापासून वंचित आहे हे खरे नाही.

उजनी प्रकल्पाचे प्रकल्पीय सिंचन क्षेत्र १,८१,८३३ हे. (ICA) आहे, उजनी प्रकल्पाचे जून, २०२० अखेर १,६४,३८१ हे. (ICA) सिंचन क्षेत्र निर्मित झालेले आहे. सन २०२१-२०२२ मध्ये सर्व उद्भवाद्वारे उजनी प्रकल्पाचे एकूण १,९६,०८१ हे. क्षेत्र सिंचित झालेले आहे.

उजनी धरण वितरिका देखभाल दुरूस्तीसाठी योग्य त्या उपाययोजना करण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी १५ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये केली आहे.

(३) सदर मागणीबाबत मुख्य अभियंता (वि.प्र.), पुणे यांची मा.लोकप्रतिनिधीं समवेत दिनांक ०८/१०/२०२२ रोजी बैठक झाली.

दरम्यान उजनी कालवा व त्यावरील वितरण व्यवस्था देखभाल दुरूस्तीसाठी आवश्यक असलेल्या कामांचे सर्वेक्षण करून सविस्तर अंदाजपत्रक करणेविषयी सूचना देण्यात आल्या आहेत.

त्यानुसार उजनी प्रकल्पाच्या कालव्यावरील वितरण व्यवस्था दुरूस्ती कामांचे सर्वेक्षण करून सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## आदिवासी विकास विभागातील कौशल्य विकास प्रशिक्षणातील भ्रष्टाचार प्रकरणी वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागविण्याबाबत

**(४०) * १५६४७ श्री.सुरेश धस : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १४ मधील प्रश्न क्रमांक ९८३० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागातील सुमारे १५० कोटी रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून दिनांक १ जानेवारी, २०१८ ते ३१ डिसेंबर, २०२० या कालावधी दरम्यान राबविण्यात आलेल्या कौशल्य विकास प्रशिक्षणाबाबतचा सविस्तर वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागविण्यात आलेला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी अद्यापही शासनाला अहवाल प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणी दोषींवर कारवाई करण्यास विलंब करणाऱ्या संबंधितांवर कारवाई होऊन सदरील भ्रष्टाचाराची रक्कम जमीन महसूलाप्रमाणे वसुल करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या कार्यालयाचे दिनांक २३/०९/२०२२ रोजीचे आदेशान्वये सदर प्रकरणी वस्तुस्थिती दर्शक अहवालासह अभिप्राय सादर करणेकरता सहाय्यक आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित केलेली असून सदर समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

-----------------

## नागपूर येथील बाल गुन्हेगारी निर्मुलनासाठी ठोस उपाययोजना करण्याबाबत

**(४१) * १५५०२ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या प्रकाशित केलेल्या आकडेवारीनुसार राज्यात सर्वाधिक बाल गुन्हेगार उपराजधानी नागपूर येथे असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतीत उपराजधानी नागपूर पहिल्या क्रमांकावर असून नागपूरात ३५१ बाल गुन्हेगारांवर गुन्हे दाखल आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने येथील बालगुन्हेगारी निर्मुलनासाठी ठोस उपाययोजना व त्यांची योग्य अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या प्रकाशित केलेल्या आकडेवारीनुसार नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत सन २०२१ मध्ये विधीसंघर्षग्रस्त बालकांविरूध्द ३५१ गुन्हे दाखल असल्याची नोंद आहे.

(३) नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत बाल गुन्हेगारी रोखण्यासाठी/ आळा घालणेसाठी पुढीलप्रमाणे विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

१) विधी संघर्ष झालेल्या बालकांनी गुन्हेगारीकडे वळू नये त्यांचे हक्काचे संरक्षण व पुनर्वसन करणे कामी रोजी पोलीस आयुक्तालय नागपुर शहर अंर्तगत भरोसासेल येथे Counselling and Reformative Education Center (CARE) स्थापन करण्यात आले आहे.

२) CARE उपक्रमांर्तगत बालकाचे हक्काचे संरक्षण, पुनर्वसन, गुन्हेगारी पासून परावृत्त करण्याचे नियोजन, बालकांवर निगराणी, मोठे गुन्हेगारा सोबत राहू नये करीता निगराणी, असे उपक्रम राबविण्यात येत आहेत.

३) विधी संघर्षग्रस्त बालकाचे मनपरिवर्तन करीता विविध खेळ स्पर्धांचे आयोजन, प्रबोधनात्मक कार्यशाळा, प्रेरणादायी वक्त्यांचे मार्गदर्शन, विविध कला कौशल्य प्रशिक्षण, व्यसनमुक्ती कार्यक्रम, व्यावसायिक प्रशिक्षण राबविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महावितरण कंपनीत ‘विद्युत सहायक’ पदासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना तातडीने नियुक्तीपत्रे देण्याबाबत

**(४२) * १५५१३ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीने ‘विद्युत सहायक’ पदासाठी सात महिन्यांपूर्वी राबविलेल्या भरती प्रक्रियेत पात्र ठरलेल्या १,७५५ उमेदवारांना अद्यापही नियुक्तीपत्रे देण्यात आली नसल्याची बाब दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महावितरण कंपनीत ‘विद्युत सहायक’ पदासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना तातडीने नियुक्तीपत्रे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०५/०७/२०२१ अन्वये भरती प्रक्रिया राबविण्यासंदर्भात निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने विविध न्यायालयामध्ये एस.ई.बी.सी / ई.डब्ल्यू.एस आरक्षणासंबंधित न्यायनिर्णयानुसार सदर पदाचा निकाल ई.डब्ल्यू.एस प्रवर्ग वगळता दिनांक ०१/१०/२०२१ रोजी निवड यादी (४५३४ उमेदवार) व दिनांक ०१/०२/२०२२ रोजी प्रतिक्षा यादी (२२६९ उमेदवार) प्रसिध्द करण्यात आली. निवड यादी मधील उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी दिनांक २१/१०/२०२१ व दिनांक २२/१०/२०२१ रोजी करुन पात्र उमेदवारांना नियुक्ती देणेबाबतची कार्यवाही महावितरण कंपनीमार्फत करण्यात आली.

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र. २६६३/२०२१ संदर्भात मा.न्यायालयाने दिनांक २९/०७/२०२२ रोजी दिलेल्या निर्णयानुसार विद्युत सहायक पदाची सुधारीत निवड यादी तसेच शासनाने दिलेल्या मार्गदर्शनानुसार विदयुत सहायक पदाची समांतर आरक्षणासह सुधारीत प्रतिक्षा यादी (२२६९ उमेदवार) दिनांक २७/१०/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली. निवड यादीतील आरक्षणाच्या रिक्त पदांचा विचार करता सुधारीत प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची परिमंडळ निहाय वर्गवारी करुन दिनांक २९/१०/२०२२ व दिनांक ३०/१०/२०२२ रोजी त्यांना वर्ग केलेल्या परिमंडळामध्ये कागदपत्र पडताळणी करण्यात आली व पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात आली. सद्य:स्थितीत, विद्युत सहायक पदाकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या ५००० पदांच्या जाहिरातीस अनुसरुन सुमारे २९७५ पात्र उमेदवारांच्या नियुक्तीबाबतची कार्यवाही महावितरण कंपनीमार्फत करण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र २६६३/२०२१ व इतर संलग्न याचिकांबाबत मा.न्यायालयाने दिनांक २९/०७/२०२२ रोजी अंतिम न्यायनिर्णय दिलेला आहे. याबाबत शासनाने दिलेल्या मार्गदर्शनानुसार महावितरण कंपनीने मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका क्र २१२३८-२१२४५/२०२२, दिनांक १४/०९/२०२२ रोजी दाखल केली आहे. तसेच प्रतिक्षा यादीबाबत काही एस.ई.बी.सी प्रवर्गातील उमेदवारांनी मा.औरंगाबाद खंडपीठामध्ये दाखल केलेली याचिका क्र.२००५/२०२२ सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट असल्याने विदयुत सहायक पदाच्या पात्र उमेदवारांच्या नियुक्तीबाबतची कार्यवाही न्यायालयीन निर्णयाअंती महावितरण कंपनीमार्फत करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पोलीस भरतीस देण्यात आलेल्या स्थगितीबाबत

**(४३) * १५८२९ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने मेगा पोलीस भरतीची जाहिरात दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२२ रोजी प्रसिध्द करून अर्ज स्वीकारण्याचे दिनांक ३ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत प्रस्तावित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने प्रशासकीय कारणास्तव मेगा पोलीस भरती प्रक्रियेला दिनांक २९ ऑक्टोबर, २०२२ रोजी स्थगिती दिल्याने व तीन वर्षांपासून पोलीस भरती झाली नसल्याने उमेदवारांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मेगा पोलीस भरतीला स्थगिती देण्यामागची नेमकी प्रशासकीय कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू मेगा पोलीस भरती प्रक्रिया पुन:श्च सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

पोलीस शिपाई संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत दिनांक १ नोव्हेंबर, २०२२ रोजी जाहिरात प्रसिध्द करुन दिनांक ३ नोव्हेंबर, २०२२ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत आवेदन अर्ज स्वीकारण्याचे प्रस्तावित होते. मात्र कोविड-१९ सार्वत्रिक साथरोगामुळे दिनांक १ जानेवारी, २०२० नंतर कमाल वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांना परीक्षेची संधी उपलब्ध व्हावी या दृष्टीकोणातून सेवाप्रवेश नियमांत शासन अधिसूचना दिनांक ३ नोव्हेंबर, २०२२ अन्वये सुधारणा करण्यात येऊन सदरहू भरती प्रक्रिया दिनांक ९ नोव्हेंबर, २०२२ पासून सुरु करण्यात आली आहे. दिनांक ९ नोव्हेंबर, २०२२ ते दिनांक १५ डिसेंबर, २०२२ या कालावधीत ऑनलाईन आवेदन अर्ज स्वीकारण्यात येत आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईत विजचोरीचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(४४) * १५४५६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात विशेषतः पूर्व उपनगरांत वीजचोरीचे प्रमाण वाढले असल्याची बाब दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईत वीजचोरीचे प्रमाण वाढत असल्याने बेस्ट, अदानी, टाटा अशा वीज कंपन्यांनी स्थानिक पोलीस स्टेशनला तक्रारी केल्या आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील वीजचोरी रोखण्यासाठी शासनाने कोणत्या ठोस उपायोजना हाती घेतल्या वा घेण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) विद्युत अधिनियम २००३ मधील कलम १३५ अंतर्गत वीज चोरीबाबत शिक्षेची तरतूद असून त्याअंतर्गत वीज वितरण कंपनीमार्फत पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविण्याची तरतूद आहे. तसेच कलम १२६ अंतर्गत अनधिकृत वीज वापराबाबत तरतूद असून त्याअंतर्गत वीज वितरण कंपनीमार्फत अनधिकृत वीज वापराचे निर्धारण करुन ते ग्राहकांकडून भरुन घेण्याबाबत तरतूद आहे.

वीज चोरी रोखण्यासाठी वीज वितरण कंपन्यामार्फत खालील उपाययोजना केल्या जातात:-

(i) वीज मीटर मध्ये फेरफार, थेट वीज जोडणी आणि अनधिकृत वीज वापर अशा प्रकारच्या वीज चोरीच्या प्रकरणाचा शोध घेण्यासाठी विशेष कृती दल व तपासणी दल कार्यरत केली आहेत.

(ii) जेथे वीज चोरी मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता आहे. उदा. झोपडपट्टी, संक्रमण शिबीरे अशा ठिकाणी रविवारी आणि सुट्टयांच्या दिवशी विशेष धाडस सत्राचे आयोजन करण्यात येते.

(iii) उपहारगृहे, मॉल, वातानुकूलित व्यापारी आस्थापनाच्या वीज वापराच्या नोंदीचे पृथकरण करुन संशयित आस्थापनावर पाळत ठेवून धाडीचे आयोजन केले जाते.

(iv) वीज चोरीच्या प्रकरणांची माहिती प्रामाणिक नागरिकांतर्फे विशेष प्रोत्साहन योजनेव्दारे मिळविली जाते.

(v) वीज देयकाचे प्रदान न केल्यामुळे किंवा वीज चोरीच्या प्रकरणामध्ये वीज मीटर काढून टाकलेला आहे अशा जागांची नियमित तपासणी व चौकशी करुन त्या ठिकाणी धाडीचे आयोजन केले जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील आष्टी उपसा सिंचन योजनेचे प्रलंबित काम पूर्ण करण्याबाबत

**(४५) * १५८७८ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील आष्टी उपसा सिंचन योजना १९९५ साली मंजूर झालेली असून अद्यापही या योजनेचे उर्वरित काम रखडलेले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आष्टी उपसा सिंचन योजनेच्या कालव्यासाठी संपादित केलेल्या जमिनींचा मोबदला संबंधित शेतकऱ्यांना अद्यापही मिळालेला नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आष्टी उपसा सिंचन योजनेचे रखडलेले उर्वरित काम पूर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, कालव्यासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला संबंधित शेतकऱ्यांना देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) आष्टी उपसा सिंचन योजनेचा टप्पा क्र.१ पूर्ण झाला असून दिनांक ०१/०६/२०१५ पासून कार्यान्वित आहे. डावा कालवा १ ते २३ कि.मी. मधील मातीकाम ८०% पूर्ण असून, बांधकामे ६०% पूर्ण तसेच उजवा कालवा १ ते २८ कि.मी. मधील मातीकाम ९०% पूर्ण असून, बांधकामे ८०% पूर्ण आहेत. या योजनेवरील कालव्याची उर्वरीत कामे तसेच वितरण व्यवस्थेच्या कामाचा समावेश असलेली सन २०२२-२३ ची प्रापणसुची मंजूर झाली असून या कामांची अंदाजपत्रके तसेच निविदा कार्यवाही करण्याचे काम क्षेत्रियस्तरावर प्रगतीपथावर आहे.

(४) कालव्यासाठी संपादित करण्यात आलेल्या एकूण २१०.०० हे. क्षेत्रापैकी १४०.०० हे. इतके क्षेत्र भूसंपादनाचा मोबदला अदा करून संपादित करण्यात आले आहे. उर्वरीत क्षेत्र ७०.०० हे. क्षेत्र विभागाच्या ताब्यात असून सदर क्षेत्राचे संपादन करण्याची व मोबदला संबंधित शेतकऱ्यांना अदा करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील फोन टॅपिंग प्रकरणाची चौकशी निवृत्त न्यायाधिशांच्या समितीमार्फत करण्याबाबत

**(४६) * १६१७२ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील राज्य गुप्त वार्ता विभागाच्या तत्कालीन आयुक्त यांनी सन २०१९-२०२० मध्ये तत्कालीन सरकारची परवानगी न घेता फोन टॅपिंग केल्या प्रकरणी सुरु असलेल्या चौकशीस राज्य शासनाने स्थगिती दिल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फोन टॅपिंग प्रकरण न्यायप्रविष्ट असूनही शासनाने मा.न्यायालयात सदरहू प्रकरण स्थगित करण्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी निवृत्त न्यायाधिशांच्या मार्फत करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी शासनास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.
(२) नाही.
(३) सदर प्रकरणी अशा प्रकारची मागणी केल्याचे दिसून येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोरेगांव (मुंबई) येथील सिद्धार्थ रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४७) * १५१७१ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगाव (मुंबई) येथील सिध्दार्थ रुग्णालयात शवविच्छेदन करण्यास वैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे शवविच्छेदन केंद्र गत काही दिवसांपासून बंद ठेवण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिध्दार्थ रुग्णालयात डॉक्टरांची पदे रिक्त असल्यामुळे शवविच्छेदनासाठी मृतदेह विलेपार्ले येथील कुपर किंवा बोरिवलीतील भगवती रुग्णालयात न्यावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सिद्धार्थ रुग्णालयातील डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) दिनांक ०९/०९/२०२२ ते दिनांक १२/०९/२०२२ या कालावधीमध्ये वैद्यकीय अधिकारी यांची कमतरता असल्याची आगाऊ सूचना सिध्दार्थ रुग्णालयाच्या अंतर्गत संबंधित पोलीस ठाण्यांना देण्यात येवून सिध्दार्थ रुग्णालयातील शवविच्छेदन केंद्राकडील काम कुपर शवविच्छेदन व भगवती शवविच्छेदन केंद्राकडे तात्पुरत्या स्वरुपात वळविण्यात आले होते.

(३) सिध्दार्थ रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची ४ मंजूर पदे असून सद्य:स्थितीत ३ पदे भरण्यात आली आहेत व रिक्त १ पद भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई पोलीस दलातील पोलिसांचा बेस्टचा बसमधील मोफत प्रवास बंद असल्याबाबत.

**(४८) * १५२३० श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पोलीस दलातील ४० हजार पोलिसांचा बेस्ट बसमधील मोफत प्रवास बंद करण्यात आला असून, सर्व पोलिसांना २ हजार ७०० रुपये प्रवास भत्ता मिळवून देण्याचे आश्वासन देण्यात आल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ४ महिने उलटले तरीही अद्याप प्रवास भत्ता मिळालेला नसून बेस्ट बसमध्ये प्रवास करताना तिकिट काढावी लागत असल्यामुळे पोलिसांमध्ये प्रचंड नाराजी असल्याचे समजते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील पोलिसांना प्रवास भत्ता सुरु करण्याबाबत सन १९९१ मध्ये तत्कालीन राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयामध्ये मुंबई वगळता राज्यातील पोलिसांना प्रवास भत्ता सुरु करण्यात यावा हा निर्णय घेतला असल्यामुळे प्रवास भत्ता मिळण्यास अडचण निर्माण होत असल्याचे कळते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन निर्णयात बदल करणे आवश्यक असल्यामुळे ते मान्य होईपर्यंत मोफत प्रवास सुरु करण्यात यावा अशी मागणी पोलीस कर्मचाऱ्यांकडून होत आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्य सरकारने घेतलेल्या शासन निर्णयात बदल करुन मुंबईतील पोलिसांना बेस्ट प्रवास भत्ता तातडीने मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३), (४) व (५) शासन निर्णय दिनांक ४ मार्च, १९९१ अन्वये मुंबई महापालिकेच्या बी.ई. एस. टी. व पुणे, कोल्हापूर, सोलापूर व इतर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाच्या बसेसमधून कर्तव्यार्थ विनातिकीट पोलीस कर्मचाऱ्यांच्या प्रवास खर्चापोटी त्या-त्या परिवहन उपक्रमास अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत होते. महानगरपालिका क्षेत्रातील पोलीस अंमलदारांना सदरहू नि:शुल्क प्रवासापोटी वाहतूक भत्ता देय नव्हता.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या कार्यालयाने यासंदर्भात आढावा घेतला असता, बहुतांश कर्मचारी रेल्वेने व स्वत:चे खाजगी वाहनाने प्रवास करतात व खूप कमी अधिकारी/कर्मचारी बेस्ट बसेसचा उपयोग करतात असे निर्देशनास आल्याने, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या कार्यालयाकडून गृह विभाग, शासन निर्णय दिनांक ४ मार्च, १९९१ रद्द करुन वित्त विभाग दिनांक २० एप्रिल, २०२२ नुसार वाहतूक भत्ता अनुज्ञेय करण्याबाबत शासनास विनंती करण्यात आली होती. या अनुषंगाने पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केलेली शिफारस व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचा प्रस्ताव विचारात घेवून, शासन निर्णय दिनांक २१/१०/२०२२ अन्वये शासन निर्णय, दिनांक ४ मार्च, १९९१ रोजीचा शासन निर्णय रद्द करण्यात येवून, त्याऐवजी वित्त विभागाच्या दिनांक २० एप्रिल, २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार वाहतूक भत्ता पोलीस अधिकारी व अंमलदारांना अनुज्ञेय करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सर्वाधिक अपघात वळणदार रस्त्यापेक्षा सरळ मार्गावर होत असल्याबाबत

**(४९) * १५८४१ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वाधिक अपघात वळणदार रस्त्यापेक्षा सरळ मार्गावर होत असल्याची माहिती महामार्ग पोलिसांच्या आकडेवारीवरून समोर आल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात व त्यासुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-पुणे महामार्ग रस्त्यावरील सरळ मार्गावरील अपघातात वाढ होत असतानाच मुंबई-पुणे, नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावरील सरळ रस्त्यावर वाहतुकीसाठी वेग नियंत्रण यंत्रणा महामार्गावर कार्यान्वित करण्याची व इतर वाहतुकीच्या नियमांची अंमलबजावणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, सरळ रस्त्यावरील होणारे अपघात टाळण्यासाठी उपरोक्त महामार्गांवर वाहतुकीसाठी वेग नियंत्रण यंत्रणा महामार्गावर कार्यान्वित करण्याबाबत व इतर वाहतुकीच्या नियमांची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यात महामार्गावरील सरळ मार्गाची लांबी ही सामान्यत: वळण मार्गाच्या तुलनेत जास्त असल्याने सरळ मार्गावर अपघातांची संख्या जास्त आहे.

| जानेवारी ते डिसेंबर, २०२१ | |
|---|---|
| सरळ रस्त्यांवरील अपघात | २५१४६ |
| वळणाच्या रस्त्यांवरील अपघात | २८९४ |

(२) मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर पोलीस विभागाचे ४ महामार्ग पोलीस केंद्र असून या महामार्ग पोलीस केंद्रावर प्रत्येकी १ इंटरसेप्टर वाहन आहे. सदर इंटरसेप्टर वाहनावरील स्पीड गनद्वारे तसेच मुंबई पुणे द्रुतगती मार्गावरील बसविण्यात आलेल्या ५ सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांद्वारे वाहनांच्या वेग मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात येते.

(३) सरळ रस्त्यावरील होणारे अपघात टाळण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

वेग मर्यादेबाबत साईन बोर्ड, रम्बलर स्ट्रिप्स मार्किंग करण्यात आले आहे. द्रुतगती मार्गावर तसेच राष्ट्रीय महामार्गावर जड अवजड वाहनांनी लेन कटींग करू नये याकरीता महामार्ग पोलीस केंद्राकडे असणाऱ्या वाहनांमार्फत पेट्रोलिंग करून सार्वजनिक घोषणेद्वारे, मेगाफोनद्वारे अवजड वाहनांना सूचना देण्यात येतात. सदर सुचनांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांचे फोटो काढून त्यांना टोल नाक्यावर थांबवून त्यांच्यावर लेन कटींगच्या केसेस करण्यात येतात.

राष्ट्रीय महामार्ग तसेच राज्य महामार्गावर वेगमर्यादा तसेच वाहतूकीचे नियम पाळणेकामी तसेच सुरक्षितता ठेवणेकामी ट्रक, हलकी वाहन चालक, दुचाकी चालक यांची जनजागृती करण्यात येत असून द्रुतगती मार्गावर सेव्ह लाईफ फाउंडेशन मार्फत झिरो फॅटॅलिटी स्किम राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी समाजाच्या विकासासाठीच्या "जनजाती सल्लागार परिषद" च्या बैठका घेण्यात येत नसल्याबाबत

**(५०) * १६३७८ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी समाजाच्या विकासासाठी शासनाने "जनजाती सल्लागार परिषद" ची स्थापना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीमार्फत आदिवासी समाजाचे ज्वलंत प्रश्न, विकासकामे सुचविणे, रोजगार निर्मितीकरीताचे प्रश्न शासनाकडे सादर करण्यात येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिषदेच्या वेळोवेळी बैठका होऊन समाजाच्या विविध सामाजिक पदाधिकारी यांचेमार्फत माहिती जमा करून त्यावर उपाययोजना करणे गरजेचे असतानाही गेल्या कित्येक वर्षापासून "जनजाती सल्लागार परिषदेची" बैठक घेण्यात आलेली नाही, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, "जनजाती सल्लागार परिषदेची" बैठक तातडीने घेण्यात यावी तसेच सदर परिषदेची बैठक ही किमान ३ महिन्यातून एकदा नियमित घेण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.आदिवासी विकास मंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाव्दारे वारंवार मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने "जनजाती सल्लागार परिषदेची" बैठक तातडीने घेण्याबाबत व सदर परिषदेची बैठक किमान ३ महिन्यातून एकदा नियमितपणे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) राज्यात उद्भवलेल्या कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर बैठका घेण्यास बंदी असल्याने जनजाती सल्लागार परिषदेची (TAC) बैठक झालेली नाही.

तथापि, जनजाती सल्लागार परिषदेची बैठक दिनांक २३ जून, २०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती. परंतु, काही अपरिहार्य कारणामुळे सदर बैठक रद्द करण्यात आली.

(४) हे खरे आहे.

(५) सद्य:स्थितीत जनजाती सल्लागार परिषदेची पुनर्रचना करण्याची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## पुण्यातील पिंपरी-चिंचवडमध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे मिळकतीवर अतिक्रमण करून बेकायदेशीर ताबा घेतल्याबाबत

**(५१) * १५२४१ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील पिंपरी-चिंचवडमध्ये बनावट कागदपत्रे तयार करुन बनावट मोजणी करुन ती खरी असल्याचे भासवून मिळकतीवर जबरदस्तीने अतिक्रमण करत बेकायदेशीर ताबा घेतल्याची घटना दिनांक ४ जानेवारी, २०२२ ते ८ ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत मौजे डुडुळगांव येथे घडली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी दिघी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड अंतर्गत दिघी पोलीस ठाणे येथे गुरनं. ४४३/२०२२, भादंवि कलम ४२०, ४६७, ४६५, ४७१, १४९, ४०६, १२०(ब), ५०४, ५०६(२) अन्वये दिनांक ०८/१०/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात १५ आरोपी निष्पन्न झाले असून सदर गुन्हयाचा तपास सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि पालघर) तालुक्यातील लघु पाटबंधारे प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(५२) * १५१९३ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील पाणीटंचाईच्यावेळी ५ गावातील ५५० हेक्टर आदिवासी क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी हिरडपाडा येथील लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या उभारणीसाठी २००८-२००९ च्या दरसूचीवर आधारित २०१५ मध्ये रुपये ७५.९० कोटी रकमेची प्रथम सुधारित मान्यता प्रदान करण्यात आलेली होती, हे खरे आहे काय**,**
(२) असल्यास, सदरहू प्रकल्प आजही अपूर्णावस्थेत असल्याने राज्य तांत्रिक सल्लागार समिती यांनी दिलेल्या विविध अभिप्रायानुसार केलेल्या शिफारशीप्रमाणे २०१६-२०१७ च्या दरसूचीवर आधारित रुपये १८७.०४ कोटी किंमतीची दुसरी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून या प्रकल्पाचे काम २७ महिन्यांमध्ये पूर्ण करणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू प्रकल्पाचे काम निर्धारित २७ महिन्यांमध्ये पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकल्पास दिनांक ०१/०९/२०२२ रोजी व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. प्रकल्पासाठी १६६ हेक्टर भूसंपादनाची आवश्यकता असून त्यापैकी ३८ हेक्टर क्षेत्राचे संपादन पूर्ण झाले आहे. उर्वरीत भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करून प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे व पालघर जिल्ह्यातून जाणाऱ्या मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील अपघाताचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(५३) * १५६१० ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्ह्यातून जाणाऱ्या मुंबई-अहमदाबाद महामार्गावर अपघातांच्या घटना घडल्या असून असे अपघात घडणाऱ्या घातक स्थळांची संख्या वसईत जवळपास ११ असल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली तसेच मुंबई-अहमदाबाद महामार्गावर चारोटी (ता.डहाणू, जि.पालघर) जवळ कार दुर्घटनेत उद्योगपतीचा दिनांक ०४/०९/२०२२ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चार वर्षांत महामार्गावरील अपघात प्रवण क्षेत्रासह घडलेल्या अपघातांची संख्या ही १८२१ इतकी असून ३९० प्राणांतिक तर ३६९ गंभीर अपघात घडले आहेत, अपघात घडण्याची सर्वसाधारण कारणे नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणे यासह चालकांचे नियंत्रण सुटणे अशा विविध प्रकारच्या कारणांमुळे रस्ते अपघातांचे प्रमाण वाढू लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे शहरातून फाऊंटन हॉटेलकडे जाणाऱ्या रस्त्यावर पुलाचे काम बरेच वर्षांपासून सुरू आहे त्यामुळे नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता सदर पुलाचे बांधकाम कधीपर्यंत पूर्ण होणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तात्काळ उपाययोजना करून अपघात स्थळांकडे फलक अथवा चौकी उभारून वाहन चालकांवर वेगाच्या मर्यादा आणण्याच्या दृष्टीने शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,

(५) तसेच मुंबई-अहमदाबाद महामार्गावर चारोटी (ता.डहाणू, जि.पालघर) जवळ कार दुर्घटनेत उद्योगपतीच्या झालेल्या मृत्यूच्या घटनेस जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे असून पालघर पोलीस घटकात मुंबई अहमदाबाद महामार्ग कार्यक्षेत्रात अपघात घडणारे एकूण १२ घातक स्थळे आहेत.

तसेच दिनांक ०४/०९/२०२२ रोजी मुंबई-अहमदाबाद महामार्गावर चारोटी (ता.डहाणू, जि.पालघर) जवळ कार दुर्घटनेत उद्योगपतीचा मृत्यू झाला आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

चार वर्षांत महामार्गावरील अपघात प्रवण क्षेत्रात नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहन चालविणे, यासह चालकांचे नियंत्रण सुटणे यासह विविध कारणांमुळे घडलेल्या अपघातांची संख्या ही १६०६ इतकी असून ८५५ प्राणांतिक तर ७१३ गंभीर अपघात घडले आहेत.

(३) मे, २०२३ पर्यंत सदर पुलाचे संपूर्ण काम होणे अपेक्षित आहे.

(४) अपघातांच्या घटना रोखण्याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

- सदर महामार्गावर एकूण ०३ महामार्ग पोलीस केंद्रे असून या केंद्रावर ०३ इंटरसेप्टर वाहने कार्यरत आहेत. सदर वाहनांच्या मदतीने वेग मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात येते.

- महामार्गावर असलेल्या अपघात प्रवण क्षेत्राच्या ठिकाणी दिशा दर्शक, वेग मर्यादा, वळण रस्ता याबाबतचे सुचना फलक लावण्यात आले आहेत.
- जड अवजड वाहनांनी लेन कटींग करू नये याकरीता महामार्ग पोलीस केंद्राकडे असणाऱ्या वाहनांमार्फत पेट्रोलिंग करून सार्वजनिक घोषणेद्वारे, मेगाफोनद्वारे अवजड वाहनांना सूचना देण्यात येतात.

(५) सदर घटनेतील आरोपी वाहन चालकाविरुध्द कासा पोलीस ठाणे येथे गु.र.न.२१४/२०२२ भा.द.वि. कलम ३०४अ, २७९, ३३७, ३३८ सह मोटार वाहन कायदा कलम १८४, ११२/ १८३(१), १७७(अ), मोटार वाहन चालक नियम ५ व ६ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या परदेश शिष्यवृत्ती योजनेतील जाचक अटींमुळे आदिवासी विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ मिळत नसल्याबाबत

**(५४) * १५९२४ डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे या उद्देशाने आदिवासी विकास विभागाकडून परदेश शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेचा प्रचार व प्रसार न झाल्याने आणि योजनेतील जाचक अटींमुळे तसेच शिष्यवृत्ती योजनेचा लाभ कसा घ्यावा, त्यांच्या अभ्यासक्रमांची माहिती, परदेश भाषांचे शिक्षण याबाबतची माहितीच विद्यार्थ्यांना नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे आदिवासी विभागाने प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू करावा अशी मागणी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन या योजनेचा प्रचार व प्रसार करण्यासह योजनेतील जाचक अटी रद्द करून आदिवासी विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अशा प्रकारचे कोणतेही निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(४) शासन निर्णय दिनांक १६/०३/२०१६ अन्वये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याच्या अनुषंगाने अर्ज सादर करण्यापासून ते लाभार्थ्यांची निवड करण्याबाबतचा कालबध्द कार्यक्रम नमूद केला आहे. त्या अनुषंगाने आयुक्त कार्यालयस्तरावरुन प्रतिवर्षी माहे मे मध्ये परदेशी शिष्यवृत्ती योजनेची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात येते.

सन २००७-०८ ते सन २०२२-२३ या कालावधीत एकूण ४४ विद्यार्थ्यांना परदेश शिष्यवृत्तीचा लाभ मंजूर करण्यात आला आहे.

शासन निर्णय दिनांक १६/०३/२०१६ अन्वये विद्यार्थ्यांच्या पालकांची उत्पन्न मर्यादा रुपये ६.०० लक्ष इतकी करण्यात आली आहे. तसेच विद्यापीठांचे क्यू एस वर्ल्ड रँकींग ३०० ठेवण्यात आले आहे. विविध संघटना यांच्या मागणीनुसार शासन निर्णय दिनांक १६/०३/२०१६ मध्ये सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील दादरसह सर्वच महत्वाच्या रेल्वे स्थानकांवर टॅक्सी चालकांकडून वाहतूक नियमांचे उल्लंघन होत असल्याबाबत

**(५५) * १५१४७ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर रेल्वे स्थानक (पश्चिम) येथील टॅक्सी चालकांकडून होत असलेले वाहतूक नियमांचे उल्लंघन रोखण्यासाठी तसेच प्रवाशांच्या मदतीसाठी रात्री आणि पहाटेच्या वेळेस वाहतूक पोलिसांचे ‘विशेष मदत पथक’ तैनात करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ६ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार मागणीच्या अनुषंगाने मुंबईतील दादरसह सर्वच महत्वाच्या रेल्वे स्थानकांवर टॅक्सी चालकांकडून होत असलेले वाहतूक नियमांचे उल्लंघन रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

- टॅक्सी चालकांकडून होत असलेल्या वाहतूक नियमांचे उल्लंघन रोखण्यासाठी तसेच प्रवाशांच्या मदतीसाठी दादर वाहतूक विभागामार्फत प्रथम सत्र व द्वितीय सत्रात प्रत्येकी १ पोलीस अधिकारी व २ पोलीस अंमलदार तसेच रात्रपाळीसाठी १ पोलीस अंमलदार नेमण्यात आले असून त्यामार्फत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या टॅक्सी चालकांवर कायदेशीर कारवाई करणे, टॅक्सी रांगेमध्ये लावणे, ज्येष्ठ नागरिक, महिला प्रवाशांना मदत करणे इ. कामे करण्यात येतात.
- प्रवाशांना रेल्वे स्थानकात येणे जाणे सुलभ व्हावे व वाहतूक सुरळीत रहावी म्हणून महानगरपालिका व स्थानिक पोलीसांच्या मदतीने अनधिकृत फेरीवाले यांच्याविरुध्द वेळोवेळी कारवाई करण्यात येते.
- टॅक्सी चालक व नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबतचे सूचना फलक रेल्वे स्टेशन परिसरात लावण्यात आलेले आहेत.
- दादर रेल्वे स्थानकाप्रमाणे मुंबईतील विविध रेल्वे स्थानकावर देखील टॅक्सी चालकांना शिस्त लावण्यासाठी विशेष अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

- मुंबई मधील महत्त्वाच्या रेल्वे स्थानक परिसरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या टॅक्सी चालकांवर मोटार वाहन कायद्यान्वये दिनांक १ जानेवारी, २०२२ ते अद्यापपर्यंत एकूण १,२४,२२४ ई-चलन कारवाई करण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## म्हाडाच्या पदभरती प्रकियेमध्ये गैरप्रकार झाल्याबाबत

**(५६) * १५४८७ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव : तारांकित प्रश्न क्रमांक १२५३६ ला दिनांक ५ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) रिक्त ५६५ पदांसाठी घेण्यात आलेल्या ऑनलाईन भरती प्रक्रियेत गैरप्रकार झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शासकीय विभागाच्या परीक्षा MPSC मार्फत घेण्याबाबतची निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात टाटा कन्सल्टंसी सर्व्हिसेसकडून चौकशी करण्यात आली असता निवड यादीतील ६३ पैकी ६० जण दोषी आढळले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरील दोषींवर फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील (म्हाडा) रिक्त पदे टी.सी.एस. कंपनीमार्फत न भरता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) टि.सी.एस.लि. यांचेमार्फत ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आलेल्या परीक्षेमधील गुणवत्तेच्या आधारे कागदपत्र सादर करण्याकरीता बोलाविण्यात येणाऱ्या सर्व १६३३ उमेदवारांचे फोटो व लॉग डीटेल्स तपासण्यात आले. त्यापैकी ६१ उमेदवारांचे फोटो जुळत नसल्याने किंवा लॉग डिटेल्स शंकास्पद असल्याने त्या उमेदवारांना संशयास्पद वर्गवारीमध्ये ठेवण्यात आले. चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांचे निकाल राखून ठेवण्यात आले आहेत. त्यापैकी ६० संशयित उमेदवारांविरुध्द खेरवाडी पोलीस स्टेशन, वांद्रे (पूर्व) येथे दिनांक ०७/१२/२०२२ रोजी प्रथम खबरी अहवाल क्र १०१५/२०२२ दाखल केला आहे.

(२) होय.

(३) कागदपत्र सादर करण्याकरीता बोलाविण्यात आलेल्या १६३३ उमेदवारांमधील ६० उमेदवारांपैकी ३९ उमेदवारांचे फोटो जुळत नाही आणि २१ उमेदवारांचे लॉग डीटेल्स संशयास्पद आढळले आहेत.

(४) म्हाडामार्फत संशयास्पद उमेदवारांविरुध्द खेरवाडी पोलीस स्टेशन, वांद्रे (पूर्व) येथे गुन्हा नोंद क्र.१०१५/२०२२, दिनांक ०७/१२/२०२२ अन्वये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आला आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१/११/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये, भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळांच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) गट-ब (अराजपत्रित) गट-क व

गट-ड संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील पदे सरळसेवेने भरताना स्पर्धा परीक्षा प्रक्रिया टि.सी.एस. - आयओएन (टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लिमिटेड) व आय.बी.पी.एस. (इंस्टीट्यूट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन) या कंपनींमार्फत राबविण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून त्याअनुषंगाने पदभरतीबाबत म्हाडामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये क्रीडा शिक्षक/क्रीडा मार्गदर्शकांची नियमित वा कंत्राटी पध्दतीने पदभरती करण्याबाबत

**(५७) * १६३८१ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये क्रीडा शिक्षक/क्रीडा मार्गदर्शकांची नियमित पदे मंजूर होईपर्यंत प्रत्येक शासकीय आश्रमशाळेत कंत्राटी पध्दतीने एक क्रीडा शिक्षक/क्रीडा मार्गदर्शक (कोच) नेमणूक करण्याबाबत शासनाने दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासन निर्णय निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अनेक आदिवासी आश्रमशाळांमध्ये अद्यापही शासन निर्णयानुसार क्रीडा शिक्षक/क्रीडा मार्गदर्शकांची नियमित वा कंत्राटी पध्दतीने पदे भरण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने शासन निर्णयानुसार कारवाई न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली वा येणार आहे तसेच सदर पदे तात्काळ भरण्याबाबत कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) होय.
(२) व (३) हे खरे नाही.

सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बहुतांश प्रकल्प कार्यालयात कंत्राटी क्रीडा शिक्षकांची नेमणूक करण्यात आले होती. तथापि, सन २०२०-२१ या शैक्षणिक सत्रात कोविड-१९ चा प्रादुर्भाव असल्यामुळे शासकीय आश्रमशाळा बंद ठेवण्यात आल्या होत्या. त्यामुळे कंत्राटी क्रीडा, कला व संगणक शिक्षक यांना सदरच्या काळात नियुक्ती आदेश देण्यात आलेले नाही. मात्र शाळा सुरू झाल्यानंतर आवश्यकतेप्रमाणे नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत. तद्नंतर सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात कंत्राटी क्रीडा शिक्षकांना नियुक्त्या देण्यात आल्या आहेत.

आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांचा सुधारित आकृतिबंध दिनांक १६/११/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये अंतिम करण्यात आलेला आहे. प्रस्तुत आकृतीबंधामध्ये शासकीय आश्रमशाळेतील क्रीडा शिक्षकांची ४९९ पदांच्या सेवा बाह्यस्त्रोताद्वारे घेण्यास मंजूरी देण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी वीज जोडणी मिळत नसल्याबाबत

**(५८) * १५२४७ श्री.महादेव जानकर, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १ लाख ६९ शेतकऱ्यांनी शेतीपंपासाठी वीज जोडणी मिळण्याकरीता अनामत रक्कम भरुनही अदयापी शेतकऱ्यांना वीज जोडणी मिळाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्याकरीता महावितरणकडे पुरेसा निधी नसल्याने जोडणी देता आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वीज जोडणीकरीता महावितरणला तात्काळ निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात सन २०२१-२२ मध्ये कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०, मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना, जिल्हा वार्षिक योजना इत्यादी योजना अंतर्गत १,४५,८६७ कृषीपंपांचे ऊर्जीकरण करण्यात आले असून मार्च २०२२ अखेर १,८०,१०६ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत. सन २०२२-२३ मध्ये नोव्हेंबर, २०२२ पर्यंत ७५,००२ कृषीपंपांचे ऊर्जीकरण करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.

दिनांक १५/०९/२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार उच्चदाब वितरण प्रणाली योजनेच्या सुधारित खर्चास (रुपये ४७३४.६१ कोटी) मान्यता दिली असून त्यापैकी विदर्भ व मराठवाड्याकरीता रुपये २२३४.२२ कोटी इतका निधी शासनाकडून प्राप्त झाला आहे. तसेच उर्वरित महाराष्ट्राकरीता रुपये १२५९.५४ कोटी इतका निधी कर्ज स्वरुपात महावितरणमार्फत उपलब्ध करुन घेतला आहे.

कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत दिनांक ३०/११/२०२२ रोजी ग्रामपंचायत स्तरावर रुपये १२०९.५९ कोटी व जिल्हा स्तरावर रुपये १२०९.५९ कोटी इतका कृषी आकस्मिकता निधी उपलब्ध आहे. तसेच, कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत २०१ ते ६०० मीटर पर्यंत अंतर असलेल्या कृषीपंपांचे ऊर्जीकरण करण्याकरीता शासनाने रुपये ५०० कोटी इतका निधी महावितरणला वितरीत केलेला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा समुह विकास आराखडा तयार करण्याबाबत

**(५९) * १५६११ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील पर्यटनाला चालना मिळावी यासाठी गत काही वर्षांपासून शासनाने विशेष प्रयत्न सुरू केले असून जिल्ह्यातील पर्यटनात वाढ होण्यासाठी आणि पर्यटन स्थळांचा समुह विकास आराखडा तयार करण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीपुढे ठेवण्यात आला होता, परंतु गत २ वर्षांपासून सक्षम संस्था मिळाली नसल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यटन केंद्रांचा विकास झाल्यास स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार असून त्याच माध्यमातून शासनाचा महसूलही वाढण्यास मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने तातडीने पर्यटनस्थळांच्या समुह विकासाच्या सर्वेक्षणासाठी सक्षम संस्था नियुक्त करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

ठाणे जिल्ह्याचा पर्यटन विषयक आराखडा तयार करण्यात यावा असे दिनांक २०/०१/२०२० रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सर्वानुमते ठरले असून शासनाने निश्चित केलेल्या Empanelled संस्थेची निश्चिती अद्यापी झालेली नाही.
(२) हे खरे आहे.
(३) Empanelled संस्थेची निवड झाल्यानंतर जिल्ह्याचा बृहत आराखडा तयार करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.